राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संलग्न,
भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी, संचालित,

# नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज

(कला, वाणिज्य व विज्ञान)

कारंजा (घाडगे), जि. वर्धा.

**Re-accredited By NAAC With 'B' Grade (CGPA - 2.50)**



# महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर वृंद .....



(खाली बसलेली पहिली रांग) प्रा. डॉ. अविनाश कदम, प्रा. डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. रविंद्र सोनटक्के, प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. प्रमोद काळे, डॉ. संजय धनवटे (प्राचार्य), प्रा. सुरेश गोडबोले, श्री. विनय गुडधे, प्रा. डॉ. गणेश मोहोड, प्रा. डॉ. सुनील पखाले, श्री. जयंत निंभोरकर, श्री. श्रीधर देशमुख, श्री. तुकारामजी वंजारी.

(खाली बसलेली दुसरी रांग) प्रा. डॉ. वंदना तागडे, श्रीमती माया सिडाम, प्रा. डॉ. गायत्री कडवे, प्रा. डॉ. सरिता राऊत, प्रा. वैशाली वैद्य, प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई, प्रा. डॉ. प्रविण काळे, प्रा. डॉ. लोकेश वानखडे, प्रा. डॉ. गौरव पेठे, प्रा. डॉ. उमेश मेश्राम, प्रा. डॉ. विजय राघोर्ते, प्रा. गौतम वाकडे, प्रा. अथर हुसैन, प्रा. डॉ. मोहन मेंढे, प्रा. डॉ. महेंद्र गावंडे, प्रा. दीपक धारणे, प्रा. डॉ. अमित याऊल, प्रा. डॉ. पल्लवी उल्हे.

(उभे असलेली रांग) श्री. वासुदेव हरले, श्री. मनोज निंभोरकर, श्री. अजय लोणकर, श्री. मंगेश मलगाम, प्रा. नितीन देवासे, श्री. राहुल देशमुख, श्री. जितेंद्र होरे, श्री. अविनाश लोहे, प्रा. जमिल शेख, श्री. शारीक खान, प्रा. अविनाश भक्ते.

# संवाद वार्षिकांक

२०२०-२१



**संपादक**

प्रा. डॉ. अमित याऊल

**सह संपादक**

प्रा. डॉ. गणेश मोहोड

प्रा. डॉ. दीपक धारणे

**प्रकाशक**

डॉ. संजय धनवटे

प्राचार्य

**नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज**

(कला, वाणिज्य व विज्ञान)

कारंजा (घा.), जि. वर्धा.

**मुद्रक**

पायोनियर प्रकाशन

---

या अंकात प्रकाशित झालेल्या लेखतील मतांशी प्रकाशक,
संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. ते मत त्या त्या लेखकाचे समजावे.

# विद्यापीठ गीत

## या भारतात बंधुभाव नित्य वसु दे....



या भारतात बंधुभाव नित्य वसु दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,
मतभेद नसू दे ।। धृ ।।

नांदोत सुखे गरीब – अमिर एक मतानी ।
मग हिंदू असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्यसुखा या सकलांमाजि वसू दे ।
दे, वरचि असा दे ।।१।।

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना,
हो सर्वस्थळी मिळूनि समुदाय–प्रार्थना ।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे, वरचि असा दे ।।२।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळ निंदका मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ।।३।।

सौंदर्य रमो घर–घरात स्वर्गापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी ।
तुकड्यास सदा सर्वदा सेवेत कसू दे ।।
दे वरचि असा दे ।।४।।

– वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

# विनम्र अभिवादन....



स्व. श्री. नारायणराव उर्फ दादासाहेब काळे





स्व. श्री. बी. एल. उर्फ बापूसाहेब देशमुख

# संस्थेचे आधारवड



**मा. ॲड. श्री. दिलीपराव उपाख्य भैय्यासाहेब काळे**
**अध्यक्ष**
भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी.



**मा. ॲड. सौ. शोभाताई काळे**
**सचिव**
भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी.



नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेजच्या प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून ग्रामीण रूग्णालय, कारंजा (घा.) ला १ लाख २३ हजार रुपये किमतीचे दोन ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर भेट

# संवाद वार्षिकांक २०१९-२०

**संपादक**

प्रा. डॉ. अमित याऊल

**सह संपादक**

प्रा. डॉ. गणेश मोहोड

प्रा. डॉ. दीपक धारणे

**प्रकाशक**

डॉ. संजय धनवटे

प्राचार्य

नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज

(कला, वाणिज्य व विज्ञान)

कारंजा (घा.), जि. वर्धा.

**मुद्रक**

पायोनियर प्रकाशन

**या अंकात प्रकाशित झालेल्या लेखतील मतांशी प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. ते मत त्या त्या लेखकाचे समजावे.**

# विद्यापीठ गीत

## या भारतात बंधुभाव नित्य वसु दे....



या भारतात बंधुभाव नित्य वसु दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,
मतभेद नसू दे ।। धृ ।।

नांदोत सुखे गरीब – अमिर एक मतानी ।
मग हिंदू असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्यसुखा या सकलांमाजि वसू दे ।
दे, वरचि असा दे ।।१।।

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना,
हो सर्वस्थळी मिळूनि समुदाय–प्रार्थना ।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे, वरचि असा दे ।।२।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळ निंदका मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ।।३।।

सौंदर्य रमो घर–घरात स्वर्गापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी ।
तुकड्यास सदा सर्वदा सेवेत कसू दे ।।
दे वरचि असा दे ।।४।।

**वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

## प्राचार्यांचे मनोगत



सृजनशील कलाकृतीतून साकार झालेल्या आपल्या महाविद्यालयाच्या 'संवाद' वार्षिकांकासाठी हे मनोगत लिहितांना मला विशेष आंनद होत आहे. महाविद्यालये ही जशी शिक्षणाची केन्द्रे असतात, तशीच ती युवकांच्या व्यक्तीमत्व निर्मितीच्या आणि साहित्य संस्कृतीच्या 'प्रयोगशाळाही' असतात. उत्साही विद्यार्थी आणि क्रियशील प्राध्यापकांच्या स्नेहभावाने महाविद्यालयात दरवर्षी निरनिराळे उपक्रम सुरुच असतात. फावल्या वेळेत 'आनंदाचे डोही, आनंद तरंग' अशा अनुभूती हे उपक्रम निश्चितच देतात. चाकोरीबद्ध यंत्र जीवनात आनंदाची हिरवळ फुलवतात. आणि या ध्यासामुळेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, कलात्मक जाणीवा समृद्ध होतात. या करिता विविध विषयांची अभ्यास मंडळे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग, शैक्षणिक व औद्योगिक सहली, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आयोजन, क्रीडा व ग्रंथालय विभाग, आयकर व गुंणतवणूक सल्ला केंद्र, रेड रिबन क्लब, संगणक विभाग, संवाद वार्षिकांक, पालक सभा व माजी विद्यार्थी मेळावे तसेच गुणवंत विद्यार्थी परितोषिक योजना, शिक्षक विद्यार्थी दत्तक योजना इत्यादी उपक्रम राबविले जातात. इथला विद्यार्थी केवळ पुस्तकी पढीकपंडित न होता, समाजाभिमुख व्हावा, त्याची ज्ञानाची आकलन कक्षा वाढावी म्हणून विविध विषयांची चर्चासत्रे, परिसंवाद, निवासी श्रमसंस्कार शिबीर, उद्‌बोधन वर्गाचे नियमित आयोजन केल्या जाते. या सर्वाचा परिपाक म्हणजे आम्हाला सत्र २०१८-१९ ला **NAAC** फेरमूल्यांकन (3rd cycle) होऊन महाविद्यालयाला 'B' (CGPA-2.50) दर्जा प्रदान करण्यात आला.

विद्यार्थीदशा ही पुढील जीवनाचा 'पाया' आहे, असे म्हणतांना संस्कार, संस्कृती, ज्ञान, कला इत्यादी मुल्यांवरच ही इमारत भक्कमपणे उभी राहते. तारूण्य म्हणजे जीवनाचा वसंतऋतु ! या वसंतात फुलणारे अंकुर गुदमरू नये म्हणून 'संवाद' सारख्या व्यासपीठाची युवकांना गरज असते. या वार्षिकांकात ज्ञानदृष्टीचा तरल भाव, स्वप्नांचा आणि सृजन सामर्थ्याचा अविष्कार प्रतिबिंबीत झाल्याचे आपल्याला आढळले. समाज जीवनाच्या कितीतरी पैलूंना स्पर्श करण्याचे, प्रतिसाद देण्याचे प्रयत्न या वार्षिकांकातून झालेले आहे.

या वार्षिकाकांच्या निर्मितीत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे, संपादक मंडळांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो व हा वार्षिकांक आपणास वाचनीय आणि बोधप्रद ठरेल, अशी आशा बाळगतो.

डॉ. संजय पं. धनवटे

# संपादकीय....

भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी, द्वारा संचालित, नारायणराव काळे स्मृती मॉडेल  कॉलेजचा सत्र २०१८-१९ चा 'संवाद वार्षिकांक' सुजाण वाचकांच्या हाती देतांना अत्यंत आनंद होत आहे. महाविद्यालयात शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी तरूण आहेत. तारूण्यावस्थेत 'कल्पकता' ही ओतप्रोत भरुण वाहात असते. याच वयात अनेक लेखक व कवी निर्माण होत असतात. त्यातूनच उद्याचा एक प्रतिभावंत साहित्यिक उदयाला येत असतो.  याची जाणीव ठेवत विद्यार्थ्याच्या कल्पनांना, सुप्तगुणांना प्रकाशित करून कल्पनाशक्तिला प्रगल्भ व भरभक्कम करण्याचे कार्य म्हणजेच 'संवाद' होय.

साहित्याचे जे विविध अंग आहे त्यामध्ये गद्य, पद्य, कथा, लघुकथा, कादंबरी, नाटक  यांचा समावेश होतो. कल्पनेच्या चक्रव्युहामध्ये तो सदैव गुरफटलेला असतो. आपल्या खऱ्या भावना त्याच असतात, ज्या आपल्या मनाच्या तळापासून येतात व त्याच भावना वाचकांना भावतात.

आमच्या महाविद्यालयात येणारा विद्यार्थी हा ग्रामीण आहे. त्याच्यामध्ये सहनशक्ती, चिकाटी, परिश्रम, परिस्थितीची जाण व संकटाला सामोर जाण्याची शक्ती आहे. परिस्थितीचे चटके खात  आपल्या जीवनाची पाऊलवाट तो चालत असतो. विद्यार्थ्यांच्या अनुभवातूनच जिवंत साहित्य अस्तित्वात येते.

शक्तिशाली भावना व संवेदनांचा उत्स्फूर्त प्रवाह म्हणजेच 'कल्पनाशक्ती' होय.  या कल्पनाशक्तिचा हा अविष्कार 'संवाद' या वार्षिकांकाच्या माध्यमातून आपल्यापुढे ठेवण्याचा हा आमचा अल्पसा प्रयत्न...!

'संवादच्या' साहित्य निर्मिती करिता अनेक विद्यार्थ्याचे साहित्य उपलब्ध झाले, परंतु आम्ही काही कारणास्तव सर्वच विद्यार्थ्याचे साहित्य प्रकाशित करू शकलो नाही. ज्यांचे साहित्य प्रकाशित झाले आणि ज्यांचे साहित्य प्रकाशित करू शकलो नाही, अशा सर्वच विद्यार्थांचे आम्ही अभिनंदन करतो.

तसेच 'संवाद' च्या प्रकाशनाकरिता ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले, त्यांचे आभार मानतो. ज्यांच्या खंबीर पाठिंब्याशिवाय 'संवाद' प्रकाशित होऊ शकला नसता, असे मा. संस्थाचालक, मा. प्राचार्य, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तरवृंद यांचे सदैव ऋणी आहोत.

सर्व विद्यार्थीमित्र व ज्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हातभार लागला त्यांचे आभार मानतो. तसेच 'संवाद' च्या सुबक मुद्रणाची जबाबदारी पायोनियर प्रकाशन, अमरावती यांनी सहजतेने स्वीकारली. या सर्वांच्या सहकार्यातूनच आज हा अंक साकार होत आहे.

धन्यवाद !

संपादक मंडळ

भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी, संचालित,

# नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज

(कला, वाणिज्य व विज्ञान)

**कारंजा (घा.), जि. वर्धा**

## महाविद्यालय विकास समिती

**२०१८-१९ ते २०२१-२२**

| | | |
|---|---|---|
| १. ॲड. श्री. दिलीपराव ना. काळे | – | अध्यक्ष |
| २. ॲड. सौ. शोभाताई दि. काळे | – | सदस्या |
| ३. डॉ. संजय पं. धनवटे (प्राचार्य) | – | पदसिद्ध सचिव |
| ४. डॉ. शामसुंदर भुतडा | – | सदस्य |
| ५. डॉ. पवन कळंबे | – | सदस्य |
| ६. डॉ. सत्यप्रकाश ह. इंदुरवाडे | – | सदस्य |
| ७. श्री. विनोद ब. व्यास | – | सदस्य |
| ८. डॉ. रविंद्र न. सोनटक्के | – | विभाग प्रमुख प्रतिनिधी |
| ९. डॉ. महेंद्र पं. गावंडे | – | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. डॉ. पल्लवी पु. उल्हे | – | शिक्षक प्रनिनिधी |
| ११. डॉ. अविनाश ज. कदम | – | आय.क्यु.ए.सी. प्रतिनिधी |

# अंतरंग

## लेख व कविता


| | | |
|---|---|---|
| १. | युवकांचे प्रेरणास्त्रोत- स्वामी विवेकानंद | - कु. तृप्ती गु. चोपडे |
| २. | क्षमा दान | - कु. अंकिता रा. मेश्राम |
| ३. | लुप्त होत चाललेले संस्कार | - कु. वैष्णवी दि. पाटमासे |
| ४. | माणुसकी हरली | - कु. मेघा गो. चौधरी |
| ५. | मोबाईल आणि मुले | - कु. मेघा गो. चौधरी |
| ६. | हुंडा व हुंडाबळी : एक अनिष्ठ प्रथा | - कु. निता रा. वाघमारे |
| ७. | स्वप्न | - कु. श्रद्धा अ. ठाकरे |
| ८. | प्रेम पत्र | - कु. श्रद्धा अ. ठाकरे |
| ९. | शेतकरी आत्महत्या | - कु. काजल ना. डोंगरे |
| १०. | मैत्री | - कु. मोनाली श्रा. आमझिरे |
| ११. | जीवनाच्या वाटेवर | - कु. वैष्णवी वा. ढोबाळे |
| १२. | स्वागत | - कु. मोनाली श्रा. आमझिरे |
| १३. | बेटी | - कु. श्वेता स. कुटे |
| १४. | आयुष्य | - कु. सुरभी कि. देशमुख |
| १५. | क्षण केव्हाच उडून गेले | - कु. वैष्णवी दि. पाटमासे |
| १६. | जीवन | - कु. सुरभी कि. देशमुख |
| १७. | Why God Made Teachers | - कु. सफिया एम. पठान |
| १८. | बेटी | - कु. शितल सु. ढोले |
| १९. | मैत्री | - कु. अंकिता रा. मेश्राम |
| २०. | आयुष्य | - कु. जयश्री रा. आमझिरे |
| २१. | माती | - अनिल अं. ढोमणे |
| २२. | मैत्री एक अतूट गाठ | - कु. गीता अ. अंतुरकर |
| २३. | लेक | - प्रशांत अ. देवासे |
| २४. | माझा बाप | - कु. दामिनी रा. कडवे |
| २५. | असं आमचं प्रेम होतं | - कु. सोनाली सु. बेलखडे |
| २६. | आयुष्य | - कु. दामिनी रा. कडवे |
| २७. | मैत्री | - कु. कोमल सातपुरे |
| २८. | प्रेम.... फक्त माझं | - रितेश सु. बेलखडे |
| २९. | गुरूस समर्पण | - कु. लिना दे. भादे |
| ३०. | आईचं मन | - कु. सेजल गो. इंगळे |
| ३१. | अडाणी माय | - कु. प्रणिता वि. काकडे |
| ३२. | ह्दयापासुन ह्दयापर्यंत | - कु. श्रद्धा अ. ठाकरे |
| ३३. | भाऊ | - कु. सोनाली सु. बेलखडे |
| ३४. | मनात येतं माझ्या | - कु. वृषाली गुरूभेले |

३५. विविध विभागांचे वार्षिक अहवाल २०१९-२०२०
३६. कला विभाग
मराठी विभाग
इंग्रजी विभाग
समाजशास्त्र विभाग
अर्थशास्त्र विभाग
गृहअर्थशास्त्र विभाग
फॅशन डिझायनिंग विभाग
राज्यशास्त्र विभाग
इतिहास विभाग
३७. वाणिज्य विभाग
वाणिज्य अभ्यास मंडळ
Annual Report : Faculty of Science
३८. सांस्कृतिक विभाग
३९. राष्ट्रीय सेवा योजना विभाग
४०. शिबिराला मान्यवरांच्या भेटी
४१. The Placement and Guidance Cell
४२. Red Ribbon Club
४३. Department of Lifelong Learning and Extension
४४. आयकर व गुंतवणूक सल्ला केन्द्र
४५. वाचन प्रेरणा दिन
४६. क्रिडा विभाग
४७. Student Guardian Scheme
४८. दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद
४९. गुणवंत विद्यार्थी पारितोषिक योजना
५०. पारितोषिकाचे नाव व पारितोषिक प्राप्त गुणवंत विद्यार्थी

****

# युवकांचे प्रेरणास्त्रोत - स्वामी विवेकानंद



स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कलकत्यातील सिमलापल्ली येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव नरेंद्र विश्वनाथ दत्त असे होते. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त कलकत्ता उच्च न्यायालयात (वकील) अॅटर्नी होते. ते सामाजिक आणि धार्मिक बाबतीत पुरोगामी विचारांचे आणि दयाळू स्वभावाचे होते. आई भुवनेश्वरी देवी या धार्मिक वृत्तीच्या होत्या. नरेंद्रनाथाच्या विचारसरणीला आकार देण्यात त्यांच्या पालकांचा वाटा होता. नरेंद्रनाथाला दर्शनशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, कला, साहित्य इत्यादी अनेक विषयात रूची होती. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्‌गीता आदी धार्मिक साहित्यात त्यांनी विशेष आवड दाखविली. त्यांना शास्त्रीय संगिताची देखील जाण होती आणि त्यांनी बेनी गुप्ता आणि अहमद खान या उस्तादांकडून गायन व वादनाचे शिक्षणही घेतले होते. नरेंद्रनाथ किशोरवस्थेपासून व्यायाम, खेळ आदी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेई अंधश्रध्दा आणि जातीभेद याविषयी त्यांनी लहान वयातच प्रश्न उपस्थित केले होते आणि सारासार विचार आणि व्यवहारी दृष्टीकोन यांचा आधार नसलेली कुठलीही गोष्ट स्वीकारण्यास नकार दिला त्यांचे मित्र त्यांना 'बिले ' या नावाने हाक मारत तर त्यांचे गुरू 'नोरेन' या शब्दाने त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, मुष्टीयुद्ध, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठीयुद्ध, गायन आणि वादन इ. छंद होते

नरेंद्रनाथांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरूवात केली, नंतर त्यांनी १८७१ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलीन इन्स्टिटयुशनमध्ये प्रवेश घेतला आणि ते १८७९ मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले, काही दिवस या संस्थेत राहिल्यानंतर पुढे त्यांनी जनरल असेम्बलीज इन्स्टिटयुशनमध्ये प्रवेश घेतला. तेथे त्यांनी तर्कशास्त्र, पाश्चात्य तत्वज्ञान आणि युरोपचा इतिहास यांचा अभ्यास केला. १८८१ साली ते फाईन आर्टची आणि १८८४ मध्ये बी.ए उत्तीर्ण झाले. नरेंद्रनाथांनी डेव्हिड ह्युम, इमॅन्युशल कान्ट, गोत्तिलेब फित्शे, बारूच स्पिनोझा,जॉर्ज हेगेल, ऑर्थर शोपेनहायर, ऑगष्ट कोम्ट, हर्बर्ट स्पेन्सर, जॉन स्टुअर्स मिल आणि चार्ल्स डार्विन इ. विचारवंताच्या लेखनाचा अभ्यास केला होता.

सन १८८२ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्याकडून त्यांनी वैदीक ज्ञानाचे व योगविद्येचे शिक्षण घेतले. योगसाधनेव्दारे परमेश्वर प्राप्ती होते, यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. रामकृष्ण परमहंसांनी त्यांचे नाव बदलून विवेकानंद असे ठेवले.

११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरीकेतील शिकागो शहरातील शिकागो आर्ट इन्स्टिटयुट येथे सर्वधर्मिय परिषद भरली होती. सुरूवातीस थोडे नर्व्हस असून देखिल त्यांनी 'अमेरीकेतील माझ्या बंधु आणि भगिनींनो.....'अशी भाषणास सुरूवात केली आणि सात सहस्त्र जमावाने टाळ्यांच्या प्रचंड कडकडाट केला. जो दोन मिनीटे अखंड चालू होता. 'जिने जगाला सहिष्णुता आणि वैश्विकतेचा स्विकार करण्याची शिकवण दिली आहे, अशा सर्वात प्राचीन असणाऱ्या संन्याश्याच्या वैदिक परंपरेच्या वतीने मी जगातील नवनिर्मित राष्ट्रांचे स्वागत करतो.....' या शब्दांत त्यांनी आपले व्याख्यान पुढे चालु केले. त्यांनी फारच सुंदर वक्तृत्व करून अमेरिकन नागरिकांची मने जिंकली. आपल्या व्याख्यानात जणू त्यांनी विश्वधर्म परिषदेचे प्राणतत्व विशद केले. काही दिवसांनी आपल्या विचारांनी त्यांनी अमेरीकेतील वृत्तपत्रांचे लक्ष वेधून घेतले. या वृत्तपत्रांनी स्वामीजींचे वर्णन भारतातून आलेला एक वादळी व्यक्तीमत्वाचा संन्यासी असे केले. न्युयॉर्क क्रिटीक ने

त्यांच्याबद्दल लिहिले की, ते दैवी वर्क्तृत्वाचे धनी तर आहेतच, परंतु त्यांचे धीरगंभीर उद्‌गारदेखील त्यांच्या काषाय वस्त्रात शोभुन दिसणाऱ्या तेजस्वी मुखमंडलाहून काही कमी आकर्षक नाहीत. 'वेदांत आणि योग' या विषयावर त्यांनी अमेरीका, इंग्लंड आणि इतर काही युरोपातील देशांमध्ये जाहीर तसेच खाजगी व्याख्याने दिली.

'विष काय आहे ? 'असा प्रश्न विवेकानंदांना विचारण्यात आला, तेव्हा त्यांनी खूप छान उत्तर दिले.' जीवनात कोणतीही गोष्ट गरजेपेक्षा जास्त मिळाली की, ते विष बनते. 'मग ती ताकद असो, गर्व असो, पैसा असो, भूक असो, जीवनात आनंदाने जगावयाचे असेल तर कामासाठी वेळ द्या, कारण ते शक्तीचे उगमस्थान आहे. खेळण्यासाठी वेळ द्या, कारण ते तारूण्याचे गुपीत आहे वाचण्यासाठी वेळ द्या, कारण तो ज्ञानाचा पाया आहे. स्वतःसाठी वेळ द्या, कारण आपण आहोत तर जग आहे आणि अतिशय महत्वाचे म्हणजे दुसऱ्यांसाठी वेळ द्या. कारण ते नसतील तर आपल्या असण्याला काहीच अर्थ नाही.

या सभेत वेदांवर आधारित दिलेल्या भाषणामुळे स्वामी विवेकानंद जगभर प्रसिद्धीला आले. हिंदू धर्मातील जनतेला व्यापक विश्वधर्माचा संदेश देणे, हिंदुधर्मातील अद्वैत तत्वज्ञानाचे श्रेष्ठत्व लोकांना पटवून देणे, हिंदू धर्माच्या खऱ्या तत्वज्ञानाची ओळख जगाला पटवून देणे या उद्देशाने प्रेरित होऊन त्यांनी सन १८९६ मध्ये रामकृष्ण मिशन ची स्थापना केली. त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय युवक दिन' म्हणून पाळला जातो. १९०२ मध्ये ते समाधिस्त झाले आज कन्याकुमारी येथे त्यांचे भव्य स्मारक आहे.

**कु. तृप्ती गु. चोपडे**
**बी. ए. भाग १**

*****

# क्षमा दान

क्षमा माँगने की तरह ही महत्वपूर्ण आदत है दुसरों को क्षमा देना । हम दुसरों की भूल को यदी मानस पटल पर पत्थर की लकीर की तरह अंकीत कर लेते है और उसे मन से मिटाने अर्थात भूलाने का नाम ही नही लेते तो अपना ही मन बोझील अथवा छिद्र –छिद्र कर लेते है भुलो को इकठ्ठा करना–यह कैसा शौक है ! सुलगती हुई राख या सडते हुये कचरें को कन मे भर देना तो गया अपनी ही बुध्दी का दवालियापन है दुसरे की भूल का अपने मन को शूल अथवा आँख का बबलू बना लेना तो अपने लिये स्वयं सूली तैयार करना अथवा काँटो की शैय्या तयार करना है फिर यदी हम दूसरो की भूलों के लिए उन्हे क्षमा नही करते तो भगवान से अपने पापों और अपराधों की भी थोडी भी क्षमा की आशा करने के भी योग्य कैसे बन सकते है ?

अतः हम मन को विशाल अथवा विराट करें और क्षमा करें यह कलियुग का अंतिम चरण है भूल तो प्रायः सभी करते है खराब आदतें भी थोडी बहुत सभी में है इसलिए क्षमा करो अब अपने जीवन में क्षमा का अध्याय खोलो और कुछ दान नही करते तो क्षमा दान ही कर दो क्षमा न करने से व्यक्ती स्वयं ही कूडेदान या नादान (बेसमझ) बन जाता है दयालू प्रभु के दयालु बच्चे बनो !

क्षमा का अर्थ यह नही है की धोखेबाज मक्कार, अत्याचारी, दृष्ट, निर्दयी व्यक्ती को ऐसा क्षमा कर दो की वह आप को ही निगल जाये दृष्ट को बार–बार दृष्टता करने की खुली छूट मत दो क्षमा करने का यह भाव भी नही है की आप तलवार उठाकर असे यहाँ से सीधे धर्मराजपुरी मे भेज दो जो की अभी खुली ही नही किसी ने ने इतनी कडी भुल की है और कितनी बार वह भूल दोहराई है और उस व्यक्ती का इरादा क्या है वह स्वयं स्वभाव का कैसा है यह सब देख कर उसे माफ करो वरना वह आपको ही साफ कर देगा या आप पर अपना हाथ साफ देगा अन्य प्रकार के दान की तरह क्षमा–दान भी पात्र को करो और दुसरो को क्षमा देने पर कुछ सतर्क हो कर देखो की वह क्षमा पा कर आक्रमण की तैय्यारी करता है या सुधरता है मन से क्षमा कर दो परन्तु अपने बचाव का उचित प्रबन्ध करलो !

**कु. अंकिता रा. मेश्राम**
**बी. एस्सी. भाग १**

*****

# लुप्त होत चाललेले संस्कार

भारतात कृषि आणि ऋषी अशा दोन संस्कृती वास करीत आहे. या दोन्ही संस्कृती मिळून भारतीय संस्कृती तयार झाली आहे. हा देश राम आणि कृष्ण बुद्ध आणि महावीर तसेच गांधी आणि विनोबा यांचा देश आहे. या सर्व थोर महापुरूषांनी संस्काराच्या भरोश्यावर इतिहास रचला व जनसामान्यांना उत्तम असे प्रभावी संस्कार सांगुन न थांबता प्रत्यक्ष जीवनात अवलंबून आदर्श निर्माण केला पण आज या महापुरूषांनी दिलेल्या संस्कारांच्या शिदोरीचा विसर पडतांना दिसत आहे. संस्कृती बदलली, संस्कार बदलले तर प्रवाह सुद्धा नक्कीच बदलणार एक काळ होता आमच्या घरावर पाटी असायची ''अतिथी देवो भव '' पण काळ बदलला अतिथीला देव मानण्याची पद्धत लोप पावली. आपल्या घरावरती अतिथी देवो भव पाटी गळून पडली व त्याऐवजी नवीन पाटी लागली, ती शुभ-लाभ म्हणजे, शुभपण आमचच आणि लाभ पण आमचाच, साधी सरळ अपेक्षा होती तो काळ पण गेला शुभ लाभ ची पाटी सुद्धा गळून पडली, आणि त्या पाटीवर लिहिलं वेलकम. ही वेल-कमची पाटी मग आमच्या घरात येणाऱ्या जाणाऱ्याची स्वागत करत राहली. काळ बदलला, वेल कमची पाटी मग आमच्या घरातून नाहीसी झाली. मग लोक कुत्रे पाळू लागली. आमच्या घरावर नवीन पाटी लागली आहे, ''कुत्र्यापासून सावध रहा'' एक काळ होता आम्ही अतिथीला देव मानणारे होतो, मात्र आता कुत्र्यापासून सावध रहायला सांगत आहे. अतिथीला देव मानण्याची परंपरा कुठं आणि लोकांनी आमच्या घरात येवूच नये म्हणून दारात कुत्री बांधण्याची परंपरा कुठं. हा विचार ज्यावेळी आम्ही करतो तर त्यावेळी आमचा प्रवास कुठे चालला आहे याचा शोध ही आम्हाला सहजपणे लागू शकतो. विदेशी जीवनमूल्ये आपल्याला फक्त लर्निंग आणि अर्निंग शिकवत असतात परंतु भारतीय जीवनमूल्ये ही लर्निंग व अर्निंग सोबत लिव्हींग सुद्धा शिकवितात जीवनातील ६२ कला आम्हाला केवळ धर्म शिकवितो. नव्या जोमाने भारतीय संस्कृतीचे गोडवे ऐकायचे असेल तर आज गरज आहे लुप्त होत चाललेल्या संस्कारांना जोपासण्याची व त्यांचा अवलंब स्वतःपासून करण्याची, की, जेणेकरून इतर राष्ट्रांना आपल्या संस्कृती संस्काराविषयक नेहमी आदरभाव वाटावा.

**कु. वैष्णवी दि. पाटमासे**
**बी. ए. भाग २**

*****



# माणुसकी हरली

कसं जगावं आजच्या युगात हेच कळत नाही. जगणं झाले अवघड, सोपे झाले मरणं. घरातील ज्वारी केव्हाच कारखान्यात गेली. भाकरीच्या टोपलीत पावाची लादी आली. काळच्या न्याहारीची जागा ब्रेकफास्ट ने घेतली. घरच्या लोण्यापेक्षा बटर जास्त किमती झाली. धान्यापासून दारू बनवण्याचा कारखाना आला म्हणे, बेरोजगारांना रोजगार मिळाला. तोच पैसा दारुच्या दुकानात गेला, उपाशी पोटी जीव तडफडून मेला, जो तो लागला धावू पैशापाठी कोणी ना राहीली कोणासाठी, तडफडून जातो जीव रस्त्याच्या काठी माणुसकी केव्हाच मेली माणूस जागे स्वार्थासाठी. नवरा बायकोचे ऐकू लागला विसर आईबापाचा पडला, ज्याच्यासाठी कष्ठाने महाल उभारला. त्यानेच त्यांना आश्रम दाखविला. गरीब कर्जात बुडू लागला. गहाण सावकाराकडे राहीला मार्ग त्याला ना सुचेना जीव दोरीला टांगला. मतलबी माणसाला त्याचा फरक ना पडला, माणुसकी नावाचा शब्दच पुसून टाकला. जिवंत मुडद्याच्या गर्दीत हरवली माणुसकी, हुंदके स्वतःचेच सांभाळत विखुरली माणुसकी, छाटली जातात दुर्बलांची रोजच मुंडके, ती बघा, लाल रक्ताने माखली माणुसकी कवडीचे मोल या दुनियेत प्राणाला पैश्याच्या बाजारात विकली माणुसकी. किती स्वार्थी जात ही माणसाची वेळ बदलताच, बदलली माणुसकी कधीतरी फुलायचा बंधुत्वाचा वसंत इथेही कसे बरे ऋतु तो विसरली, माणुसकी जीवघेण्या आयुष्याच्या या शर्यतीत जिंकला माणूस अन हरली माणूसकी. माणसातील माणुसकी गेली कुठे? हरवुनी शोधता शोधता तीला डोळ्यात दाटले पाणी. देवा तुझ्या नावानेही भीक देईना कोणी थाळीत. ह्या माझ्या दिसेना आता रूपयाचीही नाणी. जगावे की मरावे कळेनासे झाले, काही सांग माझ्या देवा आतातरी माणसात बदल होईल की नाही ? अशी कशी माणसाने माणुसकी विकली, बाप–लेकांच्या नात्यामध्ये अशी फुट पडली. सख्या भावा–भावा मध्येच दुश्मनी वाढली, माय–बापाच्या संस्कारामध्ये काय कमी पडली. का अशी बेईमानी पुढे आता माणुसकी हारली, या नविन युगामध्ये खऱ्याची दुनियाच कुठं उरली रक्ताच्या नात्यामध्ये आता कुठ आपुलकी राहीली, निर्दयीपणे मुलींवर बलात्काराची घटना वाढली. आपल्याच बापाला दूर करून खून करून राहीली, का अशी बेईमानी पुढे आता माणुसकी हारली. विनयभंग, लुटपाट आणि हत्या होतांना मी पाहिली, जाता येता रस्त्यावर लुटमारी आता खुपच वाढली. कायदा आणि प्रशासनाची भीतीच कुठे राहिली, भ्रष्ट, बेईमान लोकांची यादी आता वाढतच चालली. अशी बेईमानी पुढे आता माणुसकी हारली, बायकोवर अत्याचार करून घरातून काढून राहिली. लग्न करून तिला जगामध्ये एकटी का जाते सोडली, नवऱ्यापायी जीने आपल्या सर्व इच्छेची बंधने तोडली. तिच्याच नशिबाची दारे अशी कायमची का बंद झाली, का अश्या बेईमानी पुढे आता माणुसकी हारली. निर्लज्जेची सीमा आता कागदावरच आटून गेली, वाईट नजरेपुढे आता चांगल्याची नजर मावळली. मारणाऱ्यांना वाचवण्या ऐवजी सेल्फीतच वेळ घातली, बहुमोल जीवनाची किंमत बहुतेक आता बेभाव झाली. का बेईमानी पुढे आता माणुसकी हारली. ?

**कु. मेघा गो. चौधरी**
**बी. एस्सी. भाग २**

*****



# मोबाईल आणि मुले

हॅलो, आनंदाची बातमी आहे, मुलगी झाली हो, व्यवस्थित आहे. आताही माझ्याकडे फोन करतांना कशी टुकू टुकू पाहतेय आजकाल नवीन जन्मलेल्या बाळाच्या नजरेसमोर येणाऱ्या ह्या पहिल्या प्रसंगातूनच बाळे मोबाईलशी परिचीत होत असतील नाही का ? आपल्या आईवडील आणि घरातील इतर सदस्यांबरोबर मोबाईलही आपल्या आयुष्यातील एक घटक आहे हे नक्कीच बाळांना जाणवत असणार. अडगुलं मडगुलं किंवा ये ग गाई गोठ्यात च्या ऐवजी आजकाल डायरेक्ट मोबाईलवर इट्स माय पमकीन टमकीन हॅलो हनी बनी फिलींग समथींग समथींग हॅलो हनी बनी रिंगींग ट्रींग ट्रींग रिंगीग हॅलो हनी बनी टोको टोको टोको टोको हे गाण बाळाला ऐकवलं की ह्याच्या गोड धूनी मुळे बाळ हातपाय हालवून हसू लागल अजुन पुढे जाऊन जेव्हा मुलांना जाहिरातीचे अर्थ कळायला लागतात तेव्हा आयडीया इंटरनेट जब लगाविंग दुनिया को ना उल्लू बनाविंग कैसे उल्लू बनाविंग अशा जाहिराती लागल्या की मुलांची बोटे जाहिरातींची नक्कल करण्यासाठी वळायला लागतात. तर अशा छान छान आकर्षक गाण्यांच्या धून वापरून केलेल्या गमतीशीर जाहीरातीं पासून मुलांना मोबाईल वापरण्याचे कसे फिलींग येते. आपल्याला कोणी कसे उल्लू बनवू शकत नाही. कोणते ॲप्स कुठल्या मोबाईलमध्ये चांगले आहेत. मोबाईल वापरल्याने कशी दुनिया करलो मुठ्ठी मे ह्याचे आकलन होऊ लागते. मला वाटतं मोठ्यांपेक्षा आजकाल मुलेच आपल्या आई वडीलांना कोणता मोबाईल कसा आहे, हे पटवून देण्यात सक्षम ठरतात व मुलांनी पटवून दिलेल्या माहितीवरून त्या ब्रँडचा स्मार्टफोन घरात येतो. साधा फोनही जेव्हा मागील काळात नवलाईची गोष्ट होती तिथे दोन वर्षाच्या मुलांनाही आता मोबाईलवरचे ॲप्स चालवता येतात. ह्यात काही नवल नाही. पूर्वी शाळेतून घरी आलो, दप्तर टाकलं की हातपाय धुऊन, खाऊ खाऊन कधी अंगणात खेळायला जातो असे व्हायचे. पण त्या अंगणाची जागा आता मोबाईलच्या स्क्रीनने घेतली आहे. मैदानी खेळ सुटल्याने मुले शारीरिक व्यायामाला मुकत चालली आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या स्वास्थावर होत आहे. कोडी, बुद्धिबळ, साप शिड्यांसारख्या मनोरंजक व बौद्धिक खेळांची जागा मोबाईलच्या मेमरीने चालणाऱ्या गेमने घेतली आहे. गोष्टीची पुस्तके कालबाह्य ठरून मोबाईलवर कथा वाचल्या व पाहिल्या जातात. त्यामुळे पुस्तकांचे सुगंधीस्पर्श अनुभव मुकत चालले आहेत. नेट सर्चिंगमध्ये जशी कोणतीही चांगली माहिती क्षणात उपलब्ध असते तशी वाईट गोष्टींचीही भर असते. घरात पालकच हल्ली स्मार्टफोन वरील फेसबुक व वॉटस् ॲप सारख्या सुविधांमुळे आपल्या मोलाचा वेळ या ॲप्सवर खर्च करतात. त्यामुळे मुलांत व पालकात संभाषण कमी होत आहे. काही गोष्टी मोबाईलमुळे खरंच खूप चांगल्या झाल्या आहेत. गूगल सारख्या माध्यमातून हवी ती माहिती आज एका सेकंदात उपलब्ध होऊ शकते. काही माहितीमध्ये तफावत असते. ही बाब वेगळीच बऱ्याच गोष्टींच्या टयुटोरियल्स यूट्यूब द्वारे मिळते कुठेही अडीअडचणी ला व्यक्तींशी कॉन्टॅक्ट करण्यासाठी मोबाईल हे उत्तम साधन आहे. लांबवर अगदी फॉरेनलाही असणाऱ्या आपल्या जीवलगांबरोबर व्ही चॅट सारख्या ॲपद्वारे सेकंदात दृष्टीभेट होते त्यामुळे अशा दूरच्या व्यक्तींमध्ये बरीचशी जवळीक साधता येते. कुठलीही गोष्ट म्हणजे मोबाईलही मुलांसाठी वाईट आहे असे नाही पण त्याचा योग्य उपयोग केला गेला पाहिजे.

**कु. मेघा गो. चौधरी**
**बी. एस्सी. भाग २**



*****

# हुंडा व हुंडाबळी : एक अनिष्ठ प्रथा

**' मुलापेक्षा मुलगी बरी, दोन्ही घरचा सांभाळ करी '**

मुलगा जन्माला आल्यापासून ते त्याच्या पालन पोषणाला शिक्षणाला व जीवन घडावे त्या करिता लागणारा पैसा मुलीच्या बापाकडून लग्नाच्यावेळी काढला जातो. त्याला हुंडा म्हणतात. दैनंदिन वर्तमानपत्रामध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार करणाऱ्या पुरूषांना मात्र निर्दोष म्हणून त्याची सुटका करण्यात येते. या अत्याचाराचा विषय बहुतांशी हुंडाच आहे. मोठे मोठे लोक हुंडाबळीवर टिका करीत असतात पण प्रत्यक्ष व्यवहारात हुंडा घेण्यात त्यांचाच पुढाकार असतो. खरोखरच त्यांना विद्वान समजायचं का? आई वडील आपल्या मुलांचे पालन पोषण करतात, त्यांच्यावर योग्य संस्कार टाकतात परंतु त्यांच्यावर होणारा खर्च हा लग्नाच्यावेळी मुलीच्या बापावरच का लादला जातो? तो वयात आल्यावर वडील मंडळी त्याच्या विवाहाची तयारी करतात, ज्या प्रमाणे खेळणे घेण्याकरिता आपण एका दुकानातून दुसऱ्या दुकानात जात असतो त्याचप्रमाणे ही मंडळी कोणत्या बाजारपेठेत आपल्याला जास्त पैसा मिळेल याकरिता फिरत असतात. स्वतःला विद्वान समजणारे चार पाच दलाल त्यांच्याबरोबर असतातच. या सौदेबाजीच्या छंदात आपल्या मुलाला बैल बनवितात त्या बैलाची किंमत चुकवूनच त्या मुलीला त्या बैलासोबत जावे लागते. या विश्वामध्ये स्त्री-पुरूष ही संसाररूपी रथाची दोन चाके समजल्या जाते. या पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान आहे. स्त्री ही पुरूषांची जीवन संगीनी, त्याची गृहलक्ष्मी व त्याला देवत्वाकडे घेऊन जाणारी असते. प्रत्येक पुरूषामागे स्त्रीचे खूप योगदान असते आज शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे; पण मात्र माणसाची प्रवृत्ती विकृत होत चालली आहे. स्त्रिला फक्त भोगवादी बाहुली म्हणून समजी जाते. माहेरचा उंबरठा ओलांडल्या नंतर स्त्रीयांसाठी संसार हेच माहेर असते. ती त्यात कसलीही कसुर करत नाही. शेवटी स्त्री ही एक आई आहे, स्त्री एक बहीण आहे, स्त्री एक आजी सुद्धा आहे. जगात जर स्त्री नसली तर भावाला एक बहिण एका पुरूषाला जीवनसंगिनी, मुलाला कुशीत घेऊन निजवणारी आई मिळाली नसती. समाजात स्त्रीच्या अनेक भूमिका आहेत. जर स्त्री नसती तर जगात पुरूष येणे शक्यच नसते. स्त्रीचा गर्भपात करतेवेळी तिच्या पोटात मुलगा की मुलगी हे बघितल्या जाते. मुलगी आढळल्यास या जगात येण्यापूर्वीच तिचा नायनाट करण्यात येतो. स्त्री म्हणजे चूल आणि मूल. मुलीचा जन्म होण्याआधीच तिला मृत्यूच्या दारी ठेवले जाते. आधीच मुलींचे आईवडील मुलींना विषाची पुडी समजतात. आपल्या सुनेला मुलगा होत नाही म्हणून तिचा छळ करतात. मुलगी जन्माला आली की, तिच्या विवाहाच्या चिंतेने त्यांना सुखाने व शांतीने झोप येत नाही. ते आपल्या जीवनाचा आटापिटा करून काबाडकष्ट करून एकएक पैसा जोडत असतात. शिवाय सावकाराकडे आपले घरदार गहान करतो. शेतीवाडी विकतो व आपल्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने सासऱ्याच्या मंडळीकडून तिला त्रास दिला जातो. वेळ प्रसंगी रॉकेल टाकून जाळले जाते, तिचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो. या कृत्याला विरोध करण्यासाठी कुठलाही समाजसेवक पुढे सरसावत नाही. एकीकडे स्त्रीला पुरूषांनी अर्धांगिनी, सहधर्मचारिणी, त्यागाची व मायेची देवी समजली जाते. प्रत्येक कर्तबगार पुरूषांमागे एक स्त्रीच असते, असे समजले जाते. तिच्यावर दिवसेंदिवस अत्याचार होत आहे. हुंडा पद्धतीच्या या महाभयंकर रोगाने समाजाला पोखरून टाकले आहे. आज भितीमुळे सासरच्या मंडळीकडून आपल्या सुनेच्या गर्भाशयात मुलगा की मुलगी आहे त्यांचे परीक्षण केल जाते आणि मुलगी असेल तर त्याला नष्ट केले जाते. काय दोष होता त्या निरागस जिवाचा?

स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाला फक्त पुरूषच जबाबदार आहे. असे वाटते की, आपण शिक्षित आहोत काय ? प्रत्येक युवक व युवतीने जागृत होऊन संघटीत होण्याची आज गरज आहे. या वाईट घाणेरड्या पद्धती विरूद्ध संघर्ष करणे आवश्यक आहे. प्रशासनाने या पद्धतीवर विशेष लक्ष दिले पाहिजे. विशेषतः आजच्या नव युवकांना हे कार्य करायचे आहे. हे झाले तर आपल्या शिक्षणाला अर्थ उरेल. स्त्री आज सुशिक्षित झाली आहे. मुलांबरोबर मुलगी प्रत्येक क्षेत्रात मोठ्या पदावर आहे. आजची स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात समोर जात आहे स्त्री ही चंद्रावर पोहोचली आहे. आज आपल्याला स्त्री ही कोणत्याच क्षेत्रात मागे दिसत नाही. तरीही आपण रोजच पेपरमध्ये वाचतो, टि.व्ही. वर पाहतो की, स्त्रीवर अजूनही अत्याचार होत आहे. हे सर्व थांबवणे गरजेचे आहे. हुंडा हा रोग मिटवणे अत्यंत गरजेचे आहे.

**कु. निता रा. वाघमारे**
**बी. ए. भाग १**

*****

# स्वप्न

शब्दात नाही सांगता येणार
डोळयातून समजून घेशील ना....?
अस्वस्थ होईल मी जेव्हा
धीर मला देशील ना....?
माझ्याही नकळत दुःखावले तुला तर
माफ मला करशील ना....?
ओघळते अश्रू माझे तर
अलगद टिपून घेशील ना....?
सगळे खोटे ठरवतील मला तेव्हा
विश्वास माझ्यावर ठेवशील ना....?
चुकतेय मी असे वाटले कधी तर
हक्काने मला सांगशील ना....?
हरवले मी कुठे कधी जर
सावरून मला घेशील ना....?
कितीही भांडलो आपण तरीही
समोर आल्यावर सारे विसरून जाशील ना....?
मी आता विसरणे शक्य नाही तुला
तू मला लक्षात ठेवशील ना....?
जीव तयार आहे तुझ्यासाठी
गरज पडेल तेव्हा मागून घेशील ना....?
मला तुझी गरज आहे हे न सांगता
ओळखशील ना....?
आजवर तुझ्यासाठी काही नाही करू शकली
पण माझ्यासाठी एवढे एक करशील ना....?
तुझ्यासाठी मी कित्येकांपैकी एक असली तरी
माझ्यासाठी......
तूच एक असशील ना....?

**कु. श्रद्धा अ. ठाकरे**
**बी. ए. भाग १**

*****

# प्रेम पत्र

प्रिय,

प्रत्येक व्यक्तीला प्रेमाची गरज असते, असे मला वाटते कदाचित माझाही या सर्व गोष्टींवर विश्वास नव्हताच. परंतु ज्या क्षणी मी तुला पहील्यांदा बघीतलं त्यावेळी मलाही प्रेम करावं असं वाटलं....म्हणून

काय लिहावं, आणि काय नाही अगदी सुचेनास झालय पण तुझा बोलका चेहरा डोळ्यापुढे आला आणि सर्व शब्द एकवटून पेनाखाली येऊन गर्दी करायला लागले....मला नेहमीच वाटायच की, असावं कुणीतरी आपलं जे आपल्यावर जिवापाड प्रेम करणार, आपल आणि फक्त आपलंच. अश्याच परिस्थितकित जिवनाच्या खडतर मार्गावरून अणवाणी पायांनी चालत असतांना, कधी तुझ्या प्रेमात पडली अन कधी या ह्दयाचे एका कळीतून फुलात रूपांतर झाले कळलेच नाही,

गुलमोहराला मोहर आला. येऊनही गेला. झाडांना पानगळ आली ती ही येऊन गेली. पावसाची रिमझीम आली ती पण येऊन गेली. प्रत्येक ऋतु येत आहे आणि जात आहे पण तुझं वागणं मात्र नेहमी प्रमाणेच हसत हळु बघत माझ्या निष्पाप जीवनावर आघात करून जाणार

तुझा सुर्यासारख्या तेजस्वी चेहरा माझ्या नजरेआड लुखलुखणारे तुझे ते बदामी डोळे जणु सातही समुद्र तुझ्याच डोळयात सामावलेले आहे, असं तुझं रूप कासावीस करतय मला कधीपासून.....

तुला मी काय मागणार रे? गुलाबाच्या पाकळ्या वेचालाही वेदना होतात तुझ्या नाजुक बोटांना. तू नुसता जरी हसलास ना तरी ह्दयावरून कुणीतरी मोरपंख फिरविल्याचा भास होतो. हात फिरविल्याच्या वेदना होतात.

बघ तुझ्याही मनात माझीच वेदना जावणतीय तर मी एक प्रेमाच्या अपेक्षेचा हात घेऊन तुझ्यापुढे उभी आहे. माझ्या प्रेमात जर तू सुद्धा मला तुझी साथ दिलीस तर या जगातली सर्वात नशिबवान मीच असेल, आणि नाही जर का तू माझी साथ दिलीस तर माझ्यासारखी दुर्भाग्यवान या जगात कुणीच नसेल, हे ही स्पष्ट आहे.

मी माझी भावना तुझ्यापुढे मांडली आहेत. हीच भावना तुझ्याही मनात जाणवलीस तर हो निर्णय जो कधीपासून होण्याचा प्रयत्न करत आहे, तुझा जो निर्णय असेल तो मला मान्य असेल. कारण तेव्हा अशी अट नव्हती ना, की, मी ही तुला आवडायलाच हवी.....
तरीही तुझ्या उत्तराची मी वाट बघत राहील !

‘‘ अंतराने दूर परंतु अंतकरणातून अगदी जवळ
असणारी तुझी आणि फक्त तुझीच मी ‘‘

तु फुलांचा धोस माझा
तु संगंधी श्वास माझा
मी गळा द्यावा खूशीने
तू असा गळफास माझा

**कु. श्रद्धा अ. ठाकरे**
**बी. ए. भाग १**

*****



## शेतकरी आत्महत्या



तुझ्या उंबऱ्यावरी टेकविते हात
काळीज दाटले अश्रूनी बा......
नको देऊ साथ, पण हेटाळू नको
कुशीत तुझ्या येऊ दे बा......
फार मतभेद जगात या तुझ्या
तुझ्याच चरणी राहू दे बा......
निसर्ग हा कोपला जिव हा कापला
तरी साथ तुझी राहु दे बा......
आत्महत्येचा विचार नशिवू दे मना
तुझ्या उंबऱ्यावरीच राहू दे बा.....

**कु. काजल ना. डोंगरे**
**बी. कॉम. भाग १**

*****

## मैत्री

मैत्री करत असाल तर
पाण्यासारखी निर्मळ करा
दूरवर जाऊन सुद्धा
क्षणोक्षणी आठवेल अशी करा
मैत्री करत असाल तर
दिव्यातल्या पणती सारखी करा
अंधारात जे प्रकाश देईल
हृदयात असं एक मंदिर करा
मैत्री करत असाल तर
निसर्गापेक्षाही सुंदर करा
शेवटपर्यंत निभवण्याकरीता
मरण सुध्दा जवळ करा

**कु. मोनाली श्रा. आमझिरे**
**बी. ए. भाग २**

## जीवनाच्या वाटेवर

जीवनाच्या वाटेवर
काटे आणि फुले
दोन्हीही असतात
फुले सर्वजन वेचतात
पण काटे मात्र अश्रु गाळतात
निसर्गाकडून माणसांना
काहीतरी शिकावं लागतं
कर्तव्य सर्वश्रेष्ठ म्हणुन
जगावं लागतं
संसाराच अंत दुःखात हे
माहितच असतं सर्वांना
म्हणुन कित्येकांची आयुष्य
लावली जातात पनाला

**कु. वैष्णवी वा. ढोबाळे**
**बी. कॉम. भाग १**

*****



## स्वभाव

सुंदर घडविण्यास जीवन
कर्तव्याचं भान पाहिजे
एकमेकांच दुःख वाटण्या
वेदनेची जाण पाहिजे
नको हृदयी द्वेष भावना
निर्मळ असं मन पाहिजे
दौलत असावी ज्ञानाची
जवळ असं धन पाहिजे
उगीच नसावी व्यर्थ बडबड
शब्द ओठांवर गोड पाहिजे
वेगळाच घडविण्यास स्वतःला
मनाचीही ओढ पाहिजे
सुख आणि दुःखाचे
जीवनात चढउतार पाहिजे
गीत जीवनाचे गातांना
जीवनी या आधार पाहिजे
राग मत्सर नसावा
चांगला मनी भाव पाहिजे
फालतू नको निंदा कुणाची
प्रेमळ असा स्वभाव पाहिजे

**कु. मोनाली श्रा. आमझिरे**
**बी. ए. भाग २**

*****

## बेटी

कलियों को खिल जाने दो
मीठी खुशबू फैलाने दो
बंद करो उनकी हत्या
अब जीवन ज्योत जलाने दो ।।
कलियाँ जो तोडी तुमने
फल कहाँ से लाओगे
बेटी की हत्या करके तुम
बहु कहाँ से लाओंगे ।।
माँ धरती पर आने दो
उनको भी लहराने दो
बंद करो उनकी हत्या
अब जीवन ज्योत जलाने दो ।।
माँ दुर्गा की पुजा करके
भक्त बडे कहताते हो
कहाँ गयी वह भक्ती
जो बेटी को मार गिराते है ।।
बंद करो उनकी हत्या
अब जीवन ज्योत जलाने दो
अब जीवन ज्योत जलाने दो ।।

**कु. श्वेता स. कुटे**
**बी. ए. भाग १**

## आयुष्य

छोटया या आयुष्यात खुप काही हवं असतं.....
पण पाहिजे तेच मिळत नसत.....
असंख्य चांदण्याची भरून सुद्धा
आपलं आभाळ मात्र रिकामं असतं
हव्या असलेल्या सगळयाच गोष्टी
माणसाला मिळत नसतात.
पण न मिळणाऱ्या गोष्टीच,
माणसाला का हव्या असतात?

**कु. सुरभी कि. देशमुख**
**बी. ए. भाग २**

## क्षण केव्हाच उडून गेले

पाहता पाहता मोठे झालो
सगळेच गणित बदलत गेले
छोट्या छोट्या आनंदाचे
क्षण केव्हाच उडून गेले ।।

आता फक्त आठवणी राहिल्या
ते दिवस भरभर सरत गेले
छोट्या छोट्या आनंदाचे
क्षण केव्हाच उडून गेले ।।

खेळापेक्षा अभ्यास ही गोष्ट
महत्वाची वाटायची नाही
खेळून आल्यावर अभ्यास
ही गोष्ट घरच्यांना पटायची नाही. ।।

गल्लीमध्ये क्रिकेट खेळणे
म्हणजे मोठी धमाल असे
दोन दगडाच्या स्टम्प मध्ये
वर्ल्ड कपची मजा असे ।।

सागरगोटे, पतंग, भोवरे
सोबती सारेच सोडून गेले
छोट्या छोट्या आनंदाचे
क्षण केव्हाच उडून गेले ।।

शनिवारच्या सकाळी शाळेचे
आवरतांना धांदल होई
आणि म्हणता म्हणता दंग्यांमध्ये
रविवार हळूच निघून जाई ।।

आता फक्त विकेंड आले
त्यातले निरागसपण संपून गेले
छोट्या छोट्या आनंदाचे
क्षण केव्हाच उडून गेले ।।

स्पर्धेच्या जगातले सर्वात पहिले
दहावीचे वर्ष आले
पाहता पाहता सर्व सवंगडी
अभ्यासाच्या मागे लागले ।।

क्लासेस, कॉलेज, ट्युशनच्या गडबडीत
परीक्षा हेच उद्देश बनले
आणि बालपणीचे सुंदर दिवस
आयुष्याच्या डायरीत मागे पडले ।।

पाहता पाहता मोठे झालो
सगळेच गणित बदलत गेले
आजच्या मोठ्या इन्कम मध्ये
साठवलेल्या पैश्याची मजा नाही

मधल्या सुट्टीच्या डब्याची चव
ऑफीसच्या लंच ब्रेकला नाही
आजच्या फोर व्हिलर लाँग ड्राईव्हला
सायकलच्या डबलसीटची सर नाही

रात्रभर मारलेल्या गप्पांची गंमत
आजच्या व्हॉट्सॲप चॅटींगला नाही ।।
गुंफता गुंफता नात्याचे बंध
किस्से सारे आठवत गेले
आज थोडे थांबून मागे पाहतांना
अश्रु माझे ओघळून गेले.

**कु. वैष्णवी दि. पाटमासे**
**बी. ए. भाग २**

*****

# जीवन

कधी कधी जीवनात बेधुंद रहावं लागतं
दुःखाचे काटे टोचतांनाही खळखळून हसावं लागतं
जीवन यालाच म्हणायच असतं
दुःख असुनही दाखवायचं नसतं
मात्र पाण्याने भरलेल्या डोळ्यांना पुसत.
आणखी हसायचं असतं.....

**कु. सुरभी कि. देशमुख**
**बी. ए. भाग २**

*****

# WHY GOD MADE TEACHERS

When God Created Teachers
He Gave Us Special Friends
To Help Us Understand His World
And Trully Comprehend
The Beauty And The Wonder
Of Everything We See
And Become A Better Person
With Each Discovery
When God Created Teachers
He Gave Us Special Guides
To Show Us Ways In Which To Grow
So We Can All Decide
How To Live And How To Do
What's Right Instead Of Wrong
To Lead Us So Thet We Can Lead
And Learn How To Be Strong
Why God Created Teachers
In His Wisdom And His Grace
Was To Help Us Learn
To Make Our World
A Better Wiser Place

**Safiya M. Pathan**
B. A. II

# बेटी

क्यों ?
कभी कभी मन में यह विचार आता है की,
लडकीयों को लडको से कम क्यूँ समझा जाता है ?
लडको को कुल का वंश समझा जाता है तो
लडकींयो को बोझ क्युं समझा जाता है ?
लडको का पढना-लिखना सही समझा जाता है
लडकींयो का पढना लिखना क्यों गलत क्यों
समझा क्यों समझा जाता है ?
लडकों के पैदा होनेपर खुशी मनायी जाती है ,तो
लडकीयों के पैदा होनेपर शोक क्यों मनाया जाता है ?
लडकीयो को घर से बाहर निकलने से रोका जाता
है तो लडको को घर से बाहर उनकी मर्यादा मे
रहना क्यों नही सिखाया जाता हैरान हूँ ?
दुःखी हूँ, इस आजाद देश मे इस छोटी
सोच को बढावा क्यों दिया जाता है ?
अब जरूरत है इस संकीर्ण सोच को बदलने की
अब जरूरत है महिलाओ को सशक्त बनाने की
अब हर किसी को जागना होगा
और सबको जगाना होगा
बहुत खो लिया नारी ने अब
उसे उसका हक दिलाना होगा
स्त्रियों को खुद इसकी शुरूवात करनी होगी
स्त्रियो को खुद स्वयं को आगे बढाना होगा
उम्मीद है जल्द ही हालात बदलेंगे और
अब वक्त करवट लेगा और नही रहेगी
किसी स्त्री के चेहरे पर सिकन

**कु. शितल सु. ढोले**
**बी. एस्सी. भाग २**

*****

## मैत्री

आयुष्यभर सोबत असुन
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
ह्रदयाचे पाऊल कधी
ह्रदयाकडे वळत नाही.
इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही.
क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अश्या जगण्याला
डोळे भरून बघून घ्या.

**कु. अंकिता रा. मेश्राम**
**बी. एस्सी. भाग १**

*****



## आयुष्य

म्हणून मी हल्ली बोलतच नाही
मित्राची नावे ई-मेल आय.डी. असतात
भेटायच्या जागा चाट-रूम असतात
कट्ट्यावर कोणी आता भेटतच नाही
दिलखुलास शिवी कानी पडतच नाही
म्हणून मी हल्ली बोलतच नाही........
दिसले की हाय जातांना बाय
पण समोर असतांना प्रश्नचिन्ह कि
बोलायचं काय ?
अशी खोटी जवळीक मी कधी
साधतच नाही
मुखवटयाआड चेहरा कधी लपवत नाही
म्हणून मी हल्ली बोलतच नाही........
आज इथे उद्या तिथे कोणासाठी
कोणी थांबणार नाही
कोणीतरी साथ द्यावी हा माझा
ध्यासपण नाही
पण इथून तिथे जातांना कोणी
निरोप तरी देईल की नाही
जातांना आपण कोणी एक अश्रू तरी
ढाळेल की नाही
म्हणून मी हल्ली बोलतच नाही........
शब्दच हल्ली अर्थ विसरतात
संवेदनाच हल्ली बधीर होतात
भावनांच हल्ली बोथट होतात
अगदी थोडी माणसचं ही कविता
शेवटपर्यंत वाचतात
म्हणून मी हल्ली बोलतच नाही....

**कु. जयश्री रा. आमझिरे**
**बी. ए. भाग २**

*****

## माती

आईप्रमाणे जिने
सर्वांना स्नेह दिले
ती म्हणजे माती......
आपले शरीर चिरून
जिने अन्न दिले
ती म्हणजे माती......
छत्तीस कोटी देवांपेक्षा जी
सर्वाधिक पुजनीय आहे
ती म्हणजे माती......
सिमेंट व स्टाईलच्या घरामुळे जिच्या
स्नेहापासून आपण वंचित होत आहे
ती म्हणजे माती......
मनुष्य आपल्या स्वार्थासाठी जिच्या
अंगाचे तुकडे करतो
ती म्हणजे माती......
शेवटी मृत्यूनंतर मनुष्य जिच्या
कुशीत निवांत निजतो
ती म्हणजे माती......

**अनिल अं. ढोमणे**
**बी. ए. भाग २**

*****



## मैत्री एक अतूट गाठ

शब्दांमध्ये न सामावणारी
आणि कधीही न संपणारी
मनाच्या इवल्याशा कोपऱ्यात
हक्काने राज्य करणारी
एक निरंतर साथ म्हणजे मैत्री ।।
मनाच कोडं सोडवणारी
आपल्या चांगुलपणावर विश्वास ठेवणारी
कमतरतेवर मात करायला शिकवणारी
एक निःस्वार्थ काळजी म्हणजे मैत्री ।।
रोज-रोज बोलण्याची अपेक्षा न करणारी
पण कठीन प्रसंगी मात्र धावून येणारी
चुकीच्या मार्गावरून दूर सारणारी
एक विलक्षण सोबत म्हणजे मैत्री ।।
कधी रूसणारी तर कधी फुगणारी
पण क्षणभरात सारं काही विसरून हसवणारी
आणि मग गळ्यात हात घालून मिरवणारी
मनाच्या खोडी अन् निरागस सवय म्हणजे मैत्री ।।
मनाच्या खोडी मुकपणे सहन करणारी
आपल्या चुकाची कबुली ऐकणारी
भितीचे पहाड तोडून पाडणारी
एक अविरत क्षमता म्हणजे मैत्री ।।
आपल्या यशात आनंदाने गहिवरणारी
अन् पराभवात खंबीरपणे साथ देणारी
मनाची सारी गुपित न सांगताच जाणणारी
एक अद्‌भुत शक्ती म्हणजे मैत्री ।।
भेटी -गाठी नाही झाल्या तरी
तिखट-गोड आठवणीत सदैव रमणारी
किंबहुना नकळतच बांधली गेलेली
एक अतुट गाठ म्हणजे मैत्री ।।

**कु. गीता अ. अंतुरकर**
**बी. ए. भाग २**

*****

## लेक

आई बाबा मी तर होती तुमची परी.....
मग जगाने का पाठवल मला देवाच्या घरी
गुन्हा काय होता माझा, होती मी मुलगी जरी
आई बाबा मी तर होती तुमची परी......
जगाला मी का नाही दिसली बरी
सांगा मला कोणी तरी.....
मी ही बघीतले होते स्वप्न जगण्याचे कधी तरी
का नाही झाली माझे स्वप्ने पुरी
आई बाबा मी तर होती तुमची परी.....
देवा घालशील लेक जन्माला आता
कुणाच्याही दारी
दे तिला नराधमांसोबत लढण्याची शक्ती खरी
आई बाबा मी तर होती तुमची परी......

**प्रशांत अ. देवासे**
**बी. कॉम. भाग १**

*****

## माझा बाप

कवितांच्या या जगात सर्व
आईची माहिति गाऊ लागले
पण कष्ट करणाऱ्या त्या
बापाला का बरे विसरले?
फाटलेले कपडे घालून मुलाला ब्रॅन्डेड
कपडे घेऊन देणारा बाप असतो
स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन मुलाला
पोटभर खाऊ घालणारा बाप असतो
वरून जरी कठोर मनाचा असला तरी
आतून मऊ नारळासारखा बाप असतो
माझ्या प्रत्येक संकटात हात धरून
पाठीशी उभा असणारा तो माझा बाप असतो
आई रडून सगळं दुःख व्यथित करते पण
खरे दुःख हृदयात साठविणारा बाप असतो
मुलासाठी जीवनभराची शिदोरी जपणारा
मुलांचे स्वप्न साकार करण्यासाठी रात्रीचे
दिवस करणारा तो माझा बाप असतो
मंदिराच्या पायरीशी उभी असतांना मला
विठ्ठल पांडुरंग दिसला पण खरा देव तर मला
माझ्या काळ्या मातीत रात्रंदिवस राबणाऱ्या
बापात दिसला, बापात दिसला
बाबासुद्धा असतात जीवनाचा आधार
कधी फिटणार नाही त्याचे उपकार

**कु. दामिनी रा. कडवे**
**बी. कॉम. भाग २**

*****

## असं आमचं प्रेम होतं

माझ्या घरामागे त्याच घर होत
दहावी पासूनच आमच प्रेम होत.
मोबाईलवर आमच बोलन चालू होतं
एकमेकांवर रूसणं रागावणही चालू होतं.
प्रेम शब्दाचा अर्थही माहीत नसता
प्रेम करायला त्यांनी मला शिकविलं होतं.
प्रेमाच्या दुनियेत आम्ही रंगुन गेलो होतो
पण मात्र आमच एकत्र येण कदाचित
नशिबाला मंजूर नव्हत.
आणि प्रेम केल्यावर ते विसरायला
त्यानी मला शिकवल नव्हतं.
अस आमच प्रेम होत
अस आमच प्रेम होत.....

**कु. सोनाली सु. बेलखडे**
**बी. ए. भाग १**

*****

## आयुष्य

आयुष्य छान आहे
पण थोड लहान आहे
रडतोस काय वेड्या
लढण्यातच शान आहे.
काट्यालाही फुलांची
झुलती कमान आहे.
उचलून घे हवं ते
दुनिया दुकान आहे
जगणं निरर्थक म्हणतो
तो बेईमान आहे.
सुखासाठी कधी
हसावं लागतं
तर कधी सुखांसाठी
रडावं लागत कारण
सुंदर धबधबा बनायला
पाण्यालाही उंचावरून पडाव लागतं

**कु. दामिनी रा. कडवे**
**बी. कॉम. भाग २**

*****

## मैत्री

किती अनोळखी गाव असत
जिथे आपलं कोणी नसतं
पण काही नात असतं
की काही क्षणात आपलं असतं
हे तेच मैत्रीच गाव असतं.
कुठेचे नाते कुठे जुळते
शेवटी जावुन मैत्रीला मिळते
तेच खरे जिवलग बनते.
मैत्रीच्या सागरात सर्वच पोहतात
पण प्रत्येकाला पोहता येत नाही
शेवट पर्यंत तोच टिकतो
ज्याला मैत्रीचा अर्थ कळतो
रक्ताची नाती दुर असते
अनोळखीच जवळ असते
मैत्रीच्या धाग्याने एक असते
त्यालाच मैत्रीही नाव असते
गरीब श्रीमंत हा स्वार्थ नसते
हाच खरा मैत्रीचा अर्थ असतो.

**कु. कोमल सातपुरे**
**बी. ए. भाग १**

*****

## प्रेम ..... फक्त माझं

तुझं प्रेम खरं आहे की खोट माहित नाही
तु माझ्यात खरंच गुंतला आहेस की
नाटक चाललंय हेही कळत नाही
पण माझ्या शब्दाची माळखरी होती
हे मात्र नक्की.......
वयाचं बंधन नसतं प्रेमाला,
याची जाणिव करून दिलीस तु
पण अजुनही विलीन झाली नाही माझ्यात
माझ्याविना अधुरी राहशिल तु
हे मात्र नक्की.........
आकाश एवढं मन तुझं
अजुनही शोधतयं पहिल्या प्रेमाला
ते भेटेलही तुला..... फक्त क्षणासाठी
पण माझ्यात बहार आणणारी तु
माझ्या आयुष्यातुन गेलेली असेल
हे मात्र नक्की....

**रितेश सु. बेलखडे**
**बी. ए. भाग १**

*****

# गुरूस समर्पण

गुरूचे गुणगान करायला शब्दच सुचत नाही
कारण गुरूशिवाय समाजाचे चित्र स्पष्ट दिसत नाही
जीवनाला योग्य दिशा दाखविणारे तुम्ही
मनात आशा जागविणारे तुम्ही
तुमच्या विचारावर चालणारे आम्ही
आम्हाला मार्ग दाखविणारे तुम्ही
तुमच्याशिवाय प्रगत समाजाचे चित्रच नसते
कारण प्रत्येक नाविण्यातून तुमचेच रूप दिसते
तुमच्याशिवाय कुठे आम्हाला महत्व असते
आमचे मुल्य तुमच्यामुळेच असते
दिव्यासारखे जळणारे तुम्ही
कधी न छळणारे तुम्ही जीवनात न अडणारे तुम्ही
तुमच्या विचाराला कृतीची जोड देणारे आम्ही
आम्हाला सावरणारे तुम्ही आम्हाला घडविणारे तुम्ही
मुल्ये आमच्यात रूजविणारे तुम्ही
जीवन आमचे सजविणारे तुम्ही
आमच्या रोमारोमात तुमचेच विचार असते
तुमच्या विचाराशिवाय आमच्या
आचरणाला काय महत्व असते
समाज बदलविणारी क्रांती तुम्ही आहात
स्थित्यंतर देणारी शांती तुम्ही आहात
कधी- कधी जेव्हा गुरू आम्हाला भेटते
आदराने आमची मान गुरू समोर झुकते

**कु. लिना दे. भादे**
**बी. ए. भाग १**



*****

# आईचं मन

नाही रे कळणार बाळा
आईच ह्रदय तुला...
आनंदात लहानाचा मोठा हो
हेच मागणं देवाला.....
आईच मन कधिच कोणाला
कळणार नाही........
काळजातली ही हाक
कधीच कोणी ऐकणार नाही
जीव तुटतो रे बाळा
आईचा तुझ्यासाठी
तु फक्त हसत राहा
तेच सर्वस्व माझ्यासाठी
कळु दे मला नेहमी
तुझ्या मनातला गोंधळ
मैत्री सारखं नातं टिकवु
आणि करू मस्त चेंगळ...
आईच ते रागावण
मनाला नको लावुन घेऊस
तिचे ते बोलणे
कधी चुकीच नको समजुस....
आईच्या मनातला भावना
कधी तरी जाणून घे
तिचं ते हसण्यामागं रडणं
कधी तरी समजून घे...

**कु. सेजल गो. इंगळे**
**बी. ए. भाग १**



*****

## अडाणी माय

मायसाठी देवाच्या । मायसाठी देवाच्या
मी रोज पडते पाय
कशी सांगु ओ लोकांहो कशी
हाय हो अडाणी माय ।

जीच्या नशिबात होता साऱ्या दुःखाच डोंगर
कसा दरिद्री तीला बाप अन दरीद्रयाच तिच माहेर
तिच्या डोळयामधी होती आस एका पदराची
गेला पदर उठून अन् माय झाली ती परकी

माय ऐकलीच मई । माय ऐकलीच मई
साऱ्या जगाशी झटली
लेकीच्या सुखांसाठी नाही मागे ती हटली
माय अडाणीच मई

माय अडाणीच मई नही लीहत वाचत
आण शिकण्याची भुक तिच्या डोळी नाही लपत
माय रात भर जागे उरे चिंता तिच्या पाठी
माय हाती घे लेखन अन् गिरवती पाठी

माय शिकण्याची भुक काही मिटता मिटेना
काडी मोळी इके माय पोठ भरता भरेना
माय पार्बती मई । बाप भोळा तो शंकर
पाठी उभा होता तिच्या दिर देव न कनखर
माय अडाणीच मई ।

मले शिकवलं तिनं । मले शिकवल तिनं
तिच्या पोटी जन्म घेवून दगडांचे झाले सोनं
दगडांच झालं सोनं ।।

**कु. प्रणिता वि. काकडे**
**बी. ए. भाग २**

*****

## हृदयापासुन हृदयापर्यंत

त्या प्रेमाची या प्रेमाला
संगत जर का घडली असती तर,
हृदयाची त्या हृदयाला अलगद
भाषा कळली असती....
तु ओठाने स्पर्श करावा
माझ्या भळभळत्या दुःखाला
मलमा वाचून तू केलेली जखम
कधीची भरली असती....
कोणासाठी झुरल्याने जर
कोणी कुणाचे झाले असते तर....
तुझ्यासाठी या देहाची कैफ फुले
अंथरली असती....
प्रेम तसे तर मिळतच असते
प्रेमाच्या मोबदल्यामध्ये मात्र
तुझे हे वेड्यासारखे स्वप्ने
मरणानंतर ही जपली असती...
गोष्ट तुला मी ऐकवताना तू जर
झोपी गेला असता तर.....
मी मायेची चादर तुझीया अंगावर
पांघरली असती....

**कु. श्रद्धा अ. ठाकरे**
**बी. ए. भाग १**

*****



## भाऊ

भाऊ हा बहिणीचा आधार असतो
कारण कोणत्याही वाईट परिस्थितीत
तो बहिणीच्या सोबत असतो.
भाऊ हा बहिणीचा अभिमान असतो
कारण बहिणीला वर मान करून
जगायला तोच शिकवतो
घरी असतो तो मिला मारतो
तिची थट्टा - मस्करी करतो
पण,तोच भाऊ बहीण जेव्हा
लग्न करून सासरी जाते तेव्हा तो
खूप रडतो, खूप रडतो.
बहिणीला कोणी वाईट नजरेने
बघितले तर,त्याचे हात पाय कापून
टाकायला तो खंबीर असतो
म्हणून तर म्हणते,
भाऊ हा बहिणीचा स्वाभिमान असतो,
स्वाभिमान असतो.

**कु. सोनाली सु. बेलखडे**
**बी. ए. भाग १**

*****



## मनात येतं माझ्या

मनात येतं माझ्या
असेही कधी घडावे
निघून गेलेले मुलांचे क्षण
आयुष्यात पुन्हा परतावे
सोडून गेलेल्या व्यक्तींनी
पुन्हा एकदा भेटावे
जे मनातले समजणारे राहिले
ते सारं त्यांना सांगावे
आनंदाचे काही क्षण
त्याच्यासारखेच रहावे
कधीतरी कुणीतरी
आपल्यालाही समजुन घ्यावे
कुणीतरी आपल्याला
आपल्यापेक्षाही जास्त ओळखावे
आपले सुखः दुःख त्यांना
न सांगतानाही समजावे
आपल्यासाठीही कुणीतरी
जिवांचे रान करते
कोणाच्यातरी ह्रदयात
आपणही स्थान मिळवावे
मनात येतं माझ्या
असेही कधी घडावे
प्रेमाच्या वाटेवर.... !

**कु. वृषाली गुरुभेले**
**बी. ए. भाग १**

*****

# विविध विभागांचे वार्षिक अहवाल २०१९-२०२०

## कला विभाग

परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थी ज्ञानसंपन्न व्हावेत, या उद्देशाने महाविद्यालयाची निर्मिती झाली. समाजातील सर्वच क्षेत्रात शिकणारा विद्यार्थी अग्रेसर रहावा म्हणून महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखा ज्ञानार्जनाचे कार्य करते विशेषतः कला शाखेच्या माध्यमातून पुरक असे उपक्रम राबविले जातात. त्याकरीता अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. या अभ्यास मंडळातर्गत चर्चासत्र, परिसंवाद, प्रश्न मंजुषा, शोधनिबंध, प्रकल्प, शैक्षणिक सहल आदींचे आयोजन केल्या जाते.

### कला शाखेमध्ये सत्र २०१९-२०२० मध्ये खालीलप्रमाणे वर्गनिहाय विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

| वर्ग / विषय | बी. ए. भाग १ | | | बी. ए. भाग २ | | | बी. ए. भाग ३ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| मराठी | ९६ | १३५ | २३१ | ३६ | ९० | १२६ | २० | ६५ | ८५ |
| इंग्रजी | ९६ | १३५ | २३१ | ३६ | ९० | १२६ | २० | ६५ | ८५ |
| मराठी वाङःमय | ४१ | ६५ | १०६ | १४ | ३४ | ४८ | ०४ | २२ | २६ |
| समाजशास्त्र | ४६ | ९२ | १३८ | २० | ६५ | ८५ | १० | ४५ | ५५ |
| राज्यशास्त्र | ४१ | ५१ | ९२ | १६ | २६ | ४२ | ११ | २० | ३१ |
| अर्थशास्त्र | ९५ | ३५ | १३० | ३६ | ३४ | ७० | १९ | २० | ३९ |
| इतिहास | ५५ | ६० | ११५ | २२ | ४५ | ६७ | १६ | ३५ | ५१ |
| गृहअर्थशास्त्र | ०० | ५४ | ५४ | ०० | २५ | २५ | ०० | २३ | २३ |
| फॅशन डिझायनिंग | ०० | ५८ | ५८ | ०० | ४१ | ४१ | ०० | ३० | ३० |

**ओळख महाविद्यालयाची**

महाविद्यालयात प्रथम प्रवेश घेतांना सर्व बाबींमध्ये नवखा असतो. येथील शिक्षक, परिसर, विषय या संदर्भात त्याला माहीती नसते. महाविद्यालयाची, विद्यापीठाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाची ओळख नसते त्यामुळे तो काहीसा अस्वस्थ असतो. त्याच्यामध्ये आत्मविश्वास वृध्दिंगत होण्याच्या दृष्टीने सत्राच्या आरंभी भाग-१ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'ओळख महाविद्यालयाची' हा अभिनव कार्यक्रम घेतल्या जातो. त्यामध्ये संपूर्ण महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहीती दिल्या जाते. अशाच कार्यक्रमाचे आयोजन २०१९-२० मध्ये करण्यात आले. त्यामध्ये अभ्यास मंडळ, ग्रंथालय, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन, शैक्षणिक सहल, चर्चासत्र, परिसंवाद, प्रश्नमंजुषा, स्नेहसंमेलन आदींबाबत माहीती देण्यात आली. सोबतच अध्ययन-अध्यापन कसे महत्वाचे आहे याचीही जाण विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

# मराठी विभाग

## मराठी अभ्यास मंडळ कार्यकारिणी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | पदभार |
|---|---|---|---|
| १) | मंगेश दे. बागलेकर | बी. ए. – भाग – १ सेम ६ | अध्यक्ष |
| २) | अक्षय तु. मदनकर | बी. कॉम. – भाग – १ सेम २ | उपाध्यक्ष |
| ३) | कु. मोनाली श्रा. आमझिरे | बी. ए. – भाग – २ सेम ४ | सचिव |
| ४) | कु. कोमल प्र. खवशे | बी. कॉम. – भाग – २ सेम ४ | सहसचिव |
| ५) | प्रणव रा. बोरकर | बी.एस्सी. – भाग – १ सेम २ | सदस्य |
| ६) | कु. दीक्षा ना. वंजारी | बी. ए. – भाग – १ सेम २ | सदस्य |

**''तहान'' कादंबरी : चर्चासत्र : –**

विद्यापीठाने नेमलेल्या सदानंद देशमुख लिखित 'तहान' या कादंबरीवर दि. ३ सप्टेंबर २०१९ ला विद्यार्थ्यांचे चर्चासत्र आयोजित केल्या गेले, ग्रामीण जीवनाचे दर्शन, गावाची झालेली वाताहत, नायकाचा संघर्ष, लेखकाचे लेखन कौशल्य, त्यातील साहित्यिक मूल्य यावर चर्चा होतांना विद्यार्थ्यांनी अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | विषय |
|---|---|---|
| १) | कु. जयश्री चं. धुर्वे | कादंबरीतील व्यक्तीरेखा |
| २) | कु. पुजा म. देशमुख | सामाजिक जीवन |
| ३) | कु. प्रियंका दा. मदनकर | 'तहान' मधील संघर्ष |
| ४) | निकेश ना. लाडके | 'तहान' नायक बबन |
| ५) | प्रतिक वि. भांगे | 'तहान' साहित्यीक मूल्य |
| ६) | कु. स्नेहा वि. घागरे | 'तहान' ग्रामीण मानस |

**विदर्भ साहित्य संघ परिक्षा –**

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिती पुरस्कृत मराठी विभागाच्या वतीने विदर्भ साहित्य संघाची परीक्षा आयोजित करण्यात आली. केंद्राधिकारी डॉ. गणेश माहोड, सहकेंद्राधिकारी डॉ. सुनील पखाले यांनी काम पाहिले. ही परीक्षा दोन सत्रामध्ये घेण्यात आली त्याचा आढावा –

## विदर्भ साहित्य संघ परिक्षा – ऑक्टोंबर २०१९

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | | | |
|---|---|---|---|---|
| १) | भाषा स्नातक | (वाणिज्य) | खंड २ सत्र –३ | ६७ |
| २) | भाषा स्नातक | (कला) | खंड २ सत्र –३ | २२ |
| ३) | साहित्य स्नातक | (कला) | खंड २ सत्र –३ | १३ |
| ४) | भाषा स्नातक | (कला) | खंड ३ सत्र –५ | ०३ |
| ५) | साहित्य स्नातक | (कला) | खंड ३ सत्र –३ | ०३ |
| | | | | १०८ एकूण विद्यार्थी |

## विदर्भ साहित्य संघ परिक्षा – मार्च २०२०

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | | | |
|---|---|---|---|---|
| १) | भाषा स्नातक | (वाणिज्य) | खंड ३ सत्र –४ | ४५ |
| २) | भाषा स्नातक | (कला) | खंड ३ सत्र –६ | ०३ |
| ३) | साहित्य स्नातक | (कला) | खंड ३ सत्र –४ | २२ |
| ४) | भाषा स्नातक | (कला) | खंड ३ सत्र –४ | ११ |
| ५) | साहित्य स्नातक | (कला) | खंड ३ सत्र –६ | ०३ |
| | | | | ८४ एकूण विद्यार्थी |

**मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा :–**

स्थानिक महाविद्यालयात दि. १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२० या कालावधीमध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' साजरा करण्यात आला. या निमित्याने विद्यार्थ्यांच्या अनेक स्पर्धा घेऊन त्यांना मराठी भाषेची अभिरूची, व्यावहारिक लेखन कौशल्य, भाषण, कौशल्य, वादविवाद, आदिंचे धडे देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रमोद काळे होते. प्रास्ताविक डॉ. वंदना तागडे, डॉ. महेन्द्र गावंडे, प्रा. डॉ. दर्शन चांभारे, प्रा. डॉ. विजय काळे, श्री. विनय गुडधे यांनी विद्यार्थ्यांना समायोजित मार्गदर्शन केले.

**काव्यगायन –**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. समाजामध्ये जे जे घडतं ते ते साहित्यिक आपल्या साहित्य कृतीतून उतरवून समाजापर्यंत पोहचवितो. जसे कथा, कादंबरी, नाटक, ललितलेख, कविता इ. माध्यमातून तो समाज भाग जागृत करतो. असाच एक आगळावेगळा काव्यगायनाचा कार्यक्रम युवाकवी प्रा. डॉ. दर्शन चांभारे यांनी आपल्या विनोदी शैलीतून अनेक पैलूंना हात घातला. एकच याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**मराठी भाषा गौरव दिन –**

शासन परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. नुसार दि. २६ फेब्रुवारी २०२० ला वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे हे होते. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सचिन दिघडे, प्रा. डॉ. दर्शन चांभारे यांनी कुसुमाग्रजांचा जीवनपट दाखविला. प्रमुख पाहुणे म्हणून कलाशाखा प्रमुख डॉ. उल्हास राठोड, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. रविंद्र सोनटक्के, विज्ञान शाखा प्रा. डॉ. अमित याऊल, सहसमन्वयक प्रा. डॉ. उमेश मेश्राम उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनिल पखाले तर सुत्रसंचालन कु. पूजा हिंगवे हीने केले.

## DEPARTMENT OF ENGLISH

Study circle is necessary to perform various duties of the department. Students actively participated in curricular and extracurricular activities. We organized inaugural function at the beginning of the session. Students have a special committee to control the activities of students throughout the year. President and their body put their questions with the help of the committee. The inaugural function of study circle completed at the beginning of the session.

**The Functioning Body of the Study Circle is as Follows**

| Sr.No. | Name of Student | Class | Designation |
|---|---|---|---|
| 1. | Bhavana Wawarkar | B.A.III | President |
| 2. | Akshay Balanse | B.A.II | Secretary |
| 3. | Gunjan Sawarkar | B.A.II | Member |
| 4. | Sumit Wankhade | B.A.I | Member |
| 5. | Nisha Dudhane | B.A.I | Member |
| 6. | Naved Murtuja khan pathan | B.A.I | Member |

We organized seminar on 29 Aug. 2019 on importance of changing means of communication. All the students of Arts faculty present on the occasion. Dr. Dipak Dharne expressed views on this occasion. Ku. Komal Satpure depte also organizes a program in which student sawar about the pattern of question paper every year by providing online syllabus to students. Group discussions, seminar sand workshop frequently organizes by the dept. for all-round development of the students. We celebrate birthday of William Shakespeare. Students collected pictures and literature on Shakespeare's life and also brought some sketches. We also organizes a tour of some places.

as it relaxes tension of student from day today's life. Teachers also have some pleasureful moments from their hectic schedule In our locality, there is a reservoir named as Khairi Dam. We visited on this place. Nearby all students participated in this tour. This program organized on 11/10/2019

Department completed pre-exam workshop 18/10/2019 as a demonstration and illustration about all subjects. Each subject teacher acquainted students about pattern of question paper and distribution of marks. many students raise questions and reveal their doubts. students guided by Dr. Ulhas Rathod, Dr. Sunil Pakhale, Dr. Vijay Kale, Dr. Vandana Tagade Dr. Mahendra Gawande, Dr. Mohan Mendhe, Dr. Sarita Raut and Prof. Vaishali vaidya Principal of our college, respected Dr. Sanjay Dhanwate presided over the program.

Our college also received UGC sponsored certificate course in communicative English from session 2016-17. The course is for five years and 40 students are admissible each year. The program runs parallel to our B.A., B.Com. and B.Sc. At the end of year, certificate awarded to the students after conducting examinations. It is also found that students are able to communicate properly by the help of this course. In today's competitive world. It is necessary to have knowledge of computer and English. It is our sincere effort to improve student's knowledge for their bright future.

English Dept. organizes workshop on 'Communicative English' on 16/01/2020 Dr. Mohan Mendhe and Dr. Dipak Dharne acquainted students with various means of communication. In their guidance. We stressed on grammer and vocabulary as the basic requirements to learn any language. program was handled by Ku. Divya Kalbhut and Mr. Chetan Bhuyar expressed vote of thanks. Nearby all the students of arts faculty present on this moment.

In this way, internal evaluation was done by assignment and Viva-voce examinations as per guideline of university. Department of English always cooperated by Dr. Sanjay Dhanwate, Principal, of Our college, teaching and non teaching staff.

## समाजशास्त्र विभाग

कारंजा (घा.) परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थी ज्ञानसंपन्न व्हावेत या उद्देशाने महाविद्यालयाची निर्मिती झाली. समाजातील सर्वच क्षेत्रात शिकणारा विद्यार्थी अग्रेसर रहावा म्हणून महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखा ज्ञानार्जनाचे कार्य करते. विशेषता; कला शाखेच्या माध्यमातुन पुरक असे उपक्रम राबविले जातात. त्याकरीता अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. या अभ्यास मंडळातंर्गत चर्चासत्र, परिसंवाद, प्रश्न मंजुषा, शोधनिबंध, प्रकल्प, शैक्षणिक सहल आदींचे आयोजन केल्या जाते.

महाविद्यालयामध्ये ऐच्छिक विषय म्हणून समाजशास्त्र या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने केवळ पुस्तकी ज्ञान असणे आज महत्वाचे नाही तर, समाजशास्त्र विषयाचा अभ्यास करतांना वर्तमानकालीन घटना, स्पर्धात्मक जगाची ज्ञानप्राप्ती, विषयाबद्दल सखोल माहिती व्हावी, सामाजिक मूल्ये याचे ज्ञान समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना असणे अत्यावश्यक आहे विद्यार्थी हा परिपूर्ण घडावा, यादृष्टीने विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन स्तरावर तयारी करून घेण्यासाठी महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाचे वार्षिक नियोजन केल्या जाते. कला शाखेच्या विभाग प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली सभा घेवून अभ्यास मंडळ कार्यकरिणी गाठित करून वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येतात.

अध्ययन – अध्यापन कार्यामध्ये विद्यार्थी अधिक अभ्यासाभिमुख व्हावा. या हेतुने प्रत्येक सत्रात अभ्यास मंडळाचे गठण करण्यात येते. सत्र २०१९–२०२० मध्येही स्थानिक महाविद्यालयात 'समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन सन्मा. प्राचार्य यांचे अनुमतीने करण्यात आले. तेथील विद्यार्थ्यांची समाजशास्त्र विषया प्रति अभिरूची वाढावी. वाचन, लेखन कौशल्य वाढीस लागावे, त्यांनी लिहिते व्हावे या हेतूने समाजशास्त्र अभ्यास मंडळाची निर्मिती करण्यात आली ती कार्यकारिणी पुढील– प्रमाणे

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १) | चेतन वासुदेवजी भुयार | बी. ए. भाग ३– सेम ६ | अध्यक्ष |
| २) | अनिल अंबादास ढोमणे | बी. ए. भाग २– सेम ४ | उपाध्यक्ष |
| ३) | कु. हर्षाली अरूणराव दुधाने | बी. ए. भाग ३– सेम ६ | सचिव |
| ४) | कु. वैष्णवी डी. पाटमासे | बी. ए. भाग २– सेम ४ | सहसचिव |
| ५) | तेजस डी. ढोबळे | बी. ए. भाग १– सेम २ | सदस्य |
| ६) | कु. जयश्री व्हि. डोंगरे | बी. ए. भाग १– सेम २ | सदस्या |

**उद्‌बोधन वर्गाचे आयोजन –**

दिनांक २७/०९/२०१९ ला समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. या उद्‌बोधन वर्गाला मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ.सुनिल पखाले यांनी मार्गदर्शन केले. या उद्‌बोधन वर्गाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कु. वंदना तागडे होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उल्हास राठोड यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. गावंडे, डॉ. मेंढे उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. हर्षाली दुधाने हीने केले. तर आभार अनिल ढोमने यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील समाजशास्त्र विषयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

चर्चासत्राचे आयोजन समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने दिनांक १५/०१/२०२० ला चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे प्रमुख अतिथी म्हणून बी.ए. ६ सेम चे विद्यार्थी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. उल्हास राठोड होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. उल्हास राठोड होते. या चर्चा सत्रामध्ये ''**शेतकरी कुटूंबाच्या संदर्भात आजचे आणि उद्याचे चित्र**'' या विषयावर अनेक विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त केली. तर या चर्चा सत्रामध्ये जवळपास सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या चर्चासत्राचे सुत्रसंचालन कु. पाटमासे हीने तर आभार भुयार यांनी मानले, व्यक्त केले.

**पूर्वपरीक्षा मार्गदर्शन –**

बदलत्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप लक्षात घेता. दि. १८/१०/२०१९ रोजी सेमि. १ व ३ समाजशास्त्र या विषयासंबंधी प्रश्नाचे स्वरूप विद्यापीठीय प्रश्नपत्रिकेनुसार कसे राहील या विषयावर डॉ. उल्हास राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जेणेकरून परीक्षेला घाबरणार नाही. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानही करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. उल्हास राठोड, डॉ. सुनिल पखाले, डॉ. महेन्द्र गावंडे, डॉ. वंदना तागडे, डॉ. मोहन मेंढे, डॉ. सरिता राऊत, प्रा. वैशाली वैद्य हे लाभले होते तर अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य, सन्माननीय प्रा. डॉ. संजय धनवटे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. वैष्णवी धनराज पाटमासे यांनी केले, तर अनिल अंबादास ढोमणे यांनी

# अर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयामध्ये ऐच्छिक विषय म्हणून अर्थशास्त्र या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. संबंधित विषयाच्या संदर्भात सत्र - २०१८-२०१९ बी.ए. सेमिस्टर-१,२,३,४,५ व ६ आणि एम. ए. सेमिस्टर-१,२,३ व ४ या परीक्षेचा निकाल. म्हणजे एकूण २३९ बी. ए. ला अर्थशास्त्र या ऐच्छिक विषयाला विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता, तर एम. ए. ला एकूण ०८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

गुणवत्ता व इतर बाबी विचारात घेवून अभ्यासमंडळ कार्यकारिणीतील विद्यार्थी सदस्यांची निवड करून अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. या अभ्यास मंडळाची कार्यकारिणी पुढील प्रमाणे-

## अभ्यास मंडळ कार्यकारिणी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | वर्ग | पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | कु. सोनल प्रकाशराव गोरे | एम. ए. भाग २ | अध्यक्ष |
| २) | कु. आरती हरिशचंद्र कुईके | बी. ए. भाग ३ | उपाध्यक्ष |
| ३) | अनिल अंबादास ढोमणे | बी. ए. भाग २ | सचिव |
| ४) | कु. निता राजेंद्र वाघमारे | बी. ए. भाग १ | सहसचिव |
| ५) | कु. सोनाली श्रावण आमझीरे | बी. ए. भाग १ | सदस्य |
| ६) | सौरभ पुंडलीकराव बारंगे | बी. ए. भाग ३ | सदस्य |
| ७) | कु. वैष्णवी धनराज पाटमासे | बी. ए. भाग २ | सदस्य |
| ८) | कु दिव्या नरेश कालभूत | बी. ए. भाग २ | सदस्य |
| ९) | पवन नंदुराम देवासे | बी. ए. भाग १ | सदस्य |

वरील अभ्यास मंडळाची स्थापना दि. ०५/०९/२०१९ ला करण्यात आली. दि. २१/०९/२०१९ ला या अभ्यास मंडळाच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचा विषय 'ग्रामीण विकास व सहकारी क्षेत्र' हा होता. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. गंगाधर घागरे हे होते, तर अध्यक्ष डॉ. महेन्द्र गावंडे हे होते. कार्यक्रमाचे संचालन सौरभ पुंडलिकराव बारंगे यांनी केले तर आभार कु. दिव्या नरेश कालभूत यांनी मानले. कार्यक्रमामध्ये जवळपास १८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

दि. ०५/१०/२०१९ ला या अभ्यास मंडळाच्या वतीने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. विषय 'कृषि क्षेत्रातील समस्या व उपाय' होता. प्रमुख अतिथी डॉ. सुनील पखाले तर अध्यक्ष डॉ. महेन्द्र गावंडे हे होते.कार्यक्रमाचे संचालन कु. सोनाली श्रावण आमझीरे यांनी केले तर आभार कु. वैष्णवी धनराज पाटमासे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमामध्ये जवळपास १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

दि. ११/१०/२०१९ ला या अभ्यास मंडळाच्या वतीने पर्यावरणीय अभ्यासाकरीता निसर्ग भ्रमणाचे आयोजन करण्यात आले. या करीता खैरी या गावी असलेल्या धरणाची निवड करून तेथील जलाशयाचा कृषी व्यवसायाला कसा लाभ होतो याविषयी सविस्तर माहीती प्रत्यक्ष कृतिशील उपक्रमातुन प्राप्त केली, तसेच मत्स्य व्यवसायासंबंधी अध्ययन केले व नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद घेतला. यामध्ये जवळपास २१० विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. १८/१०/२०१९ ला या अभ्यास मंडळाच्या वतीने परीक्षेला जाता जाता या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला जवळपास २२५ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. उल्हास राठोड, डॉ. सुनिल पखाले, डॉ. विजय काळे, डॉ. महेन्द्र गावंडे, डॉ. वंदना तागडे, डॉ. मोहन मेंढे, डॉ. सरिता राऊत, प्रा. डॉ. वैशाली वैद्य हे लाभले होत तर अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य, सन्माननीय डॉ. संजय धनवटे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. वैष्णवी धनराज पाटमासे यांनी केले, तर अनिल अंबादास ढोमणे यांनी आभार मानले.

दि. ०८/०२/२०२० ला या अभ्यास मंडळाच्या वतीने उद्‍बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. विषय 'शेतीचे भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम' हा होता. प्रमुख वक्ते प्रा. नितीन देवासे होते, तर अध्यक्ष डॉ. महेन्द्र गावंडे हे होते. प्रास्ताविक प्रा. गंगाधर घागरे यांनी केले. कार्यक्रमामध्ये जवळपास १७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

अशाप्रकारे अर्थशास्त्र अभ्यास मंडळाने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व व्यक्तिमत्व विकासाला सहाय्य व्हावे याकरीता सत्र २०१९-२० मध्ये अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले. तसेच विविध महाविद्यालयीन कार्यक्रम सहभाग शोध निबंध, गटचर्चा, समूह चर्चा इत्यादीच्या मार्फत अनेक प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला.

यावर्षी अर्थशास्त्र विषयाच्या बी. ए. भाग १, भाग २ व भाग ३ करीता नियमित मूल्यांकनाच्या दृष्टिने सेमिनार, होम असायमेन्ट, मुलाखत व टेस्ट पेपर यांच्या माध्यमातून महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात आले. तसेच एम.ए. करीता सेमीनार, होम असायमेन्ट, मुलाखत व पेपर टेस्ट हे घटक अंतर्गत मुल्यांकनाकरीता महाविद्यालय स्तरावर ठेवण्यात आले होते. अर्थशास्त्र या विषयाचा अभ्यासक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर यांनी तयार केला आहे.

या शाखेतील अर्थशास्त्र विभागाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे व इतर प्राध्यापकवृंद तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी सहकार्य केले.

## गृहअर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयातील कला शाखेमध्ये आवश्यक विषयाबरोबर इतर ऐच्छिक विषयामध्ये गृहअर्थशास्त्र या प्रात्यक्षिक विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. पारंपारिक अध्यापन प्रक्रियेत नाविण्यपुर्णता आणून या प्रक्रियेत शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा देखील सक्रिय सहभाग असावा ज्यातुन त्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व बहरावे. सिध्दांत व सुप्त कलेचा समन्वय साधुन अभ्यासक्रमाव्यतिरीक्त विषयाशी निगडीत कार्यक्रमातून व्हावी हा उद्देश गृहअर्थशास्त्र विभागाचा आहे.

गृहअर्थशास्त्र या विषयाव्दारे महाविद्यालयाची विद्यार्थीनी ही आत्मनिर्भर, स्वावलंबी व स्वयंरोजगार मिळविण्यास समर्थ व्हावी व या समाजात आपला ठसा उमटवावा हा उद्देश गृहअर्थशास्त्र विभागाचा आहे.

गृहअर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थीनींसाठी सत्र २०१९-२० मध्ये मा. प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अनुमतीने वेळोवेळी अभ्यासमंडळा अंतर्गत विविध कार्यक्रम महाविद्यालयात राबविले गेले. त्यांचा लेखाजोखा पुढीलप्रमाणे- विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावा तसेच त्यांच्या गुणांना वाव मिळावा यासाठी गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींचे अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले.

## अभ्यासमंडळ कार्यकारिणी पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १. | पुजा हिंगवे | बी. ए. भाग – ५ सेम | अध्यक्ष |
| २ | श्रध्दा जसुतकर | बी. ए. भाग – ५ सेम | उपाध्यक्ष |
| ३. | श्वेता कुटे | बी. ए. भाग – ३ सेम | सचिव |
| ४. | गुंजन सावरकर | बी. ए. भाग – ३ सेम | सहसचिव |
| ५. | गिता अंतुरकर | बी. ए. भाग – १ सेम | सदस्य |
| ६. | टोनेश्वरी इंगळे | बी. ए. भाग – १ सेम | सदस्य |

**रोगप्रतिबंधक लसीवर आधारित पोस्टर प्रदर्शनी** (Immunization Poster Presentation) -

गृहअर्थशास्त्र विभागाने दिनांक १४/०९/२०१९ रोजी रोगप्रतिबंधक लसींवर आधारित पोस्टर प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीमध्ये बी. ए. भाग ५ सत्राच्या एकुण २४ विद्यार्थीनी सहभागी होत्या. विद्यार्थीनींनी गरोदरपणाच्या अवधरपासुन ते बाळाच्या जन्मानंतरच्या विविध अवस्थेतील लसींची उदा. बी. सी. जी. ट्रिपल पोलिओ, मिझल, देवी, विषमज्वर इ. अनेक लसींची माहीती पोस्टर व्दारे देण्यात आली होती.

या प्रदर्शनीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भेट दिली व पोस्टर बघुन उपस्थितांनी विद्यार्थीनींचे कौतुक केले.

**सेंद्रिय शेतीवर मार्गदर्शन** (Guidance on Organic Farming) -

गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे दिनांक ०४/१०/२०१९ रोजी 'सेंद्रिय शेतीवर मार्गदर्शन' या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महिला आर्थिक विकास महामंडळ माविम कारंजा (घा.), येथील बचत गटाच्या उपजिविका समन्वयक सौ. विजया वाघ यांनी विद्यार्थीनींना जैविक शेती कशी करायची. सेंद्रिय शेती आरोग्याच्या दृष्टीने कशी हिताची आहे. याविषयी परिपूर्ण मार्गदर्शन केले. त्या अनुषंगाने विद्यार्थीनींनी पुरक केंद्रामध्ये जैविक शेतीमधुन प्राप्त झालेल्या धान्याच्या प्रदर्शनीला भेट दिली. यामुळे विद्यार्थीनींच्या ज्ञानात भर पडून जैविक शेती करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

या कार्यशाळेचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सरिता राऊत यांनी केले. या कार्यशाळेला गृहअर्थशास्त्र विषयाच्या एकुण ८२ विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

**हस्तकला प्रदर्शनी** (Handicraft Exhibition) -

गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे दिनांक २५/०९/२०१९ 'रोजी हस्तकला प्रदर्शनींचे' आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीत बी. ए. सत्र-१ च्या एकुण ४७ विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. या प्रदर्शनीकरीता विद्यार्थीनीनी वॉलहँगींग, बॅग्स, मोबाईल कव्हर, विविध कलाकुसरीच्या वस्तू, कचऱ्यातून कला, विविध प्रकारचे बोर्ड, लोकरीपासुन वस्तू तयार केल्या होत्या.

हस्तकला प्रदर्शनीला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भेट दिली. सर्वांनी विद्यार्थीनींना प्रोत्साहित केले. कलाकुसरीच्या वस्तू ह्या स्वयंरोजगार प्राप्तीचे साधन बनू शकते. त्यांचे सर्वांनी कौतूक केले.

**पाककलेचे गृहिणी व मुलींकरीता मोफत प्रशिक्षण –**

गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे कारंजा तालुक्यातील गृहिणी व मुलींकरीता पाककलेचे मोफत प्रशिक्षण दिनांक २ डिसेंबर २०१९ ते १९ डिसेंबर २०१९ पर्यंत घेण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये स्थानिक कारंजा तालुक्यातील इतरही गावातील एकुण २० गृहिणी व मुलींचा सहभाग होता.

दैनंदिन आहारात सोयाबीनपासुन तयार केलेल्या पदार्थाचा समावेश होतो. सोयाबीन प्रथीने प्राप्तीचे उत्तम स्त्रोत आहे. या प्रशिक्षणाच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. वंदना तागडे ह्या होत्या, प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई, प्रा. डॉ. वैशाली वैद्य, प्रा. डॉ. सरिता राऊत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. वैशाली वैद्य यांनी आभार मानले.

**पाककला कार्यशाळा –**

गृहअर्थशास्त्र विषयाच्या बि. ए. सत्र–३ च्या विद्यार्थीनीकरीता दिनांक १८/०१/२०२० रोजी पाककलेवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे बि. ए. सत्र –३ च्या २५ विद्यार्थीनी सहभागी होत्या. या कार्यशाळेला प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सबाने आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज, पुलगांव या लाभल्या होत्या या कार्यशाळेचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सरिता राऊत यांनी केले होते. विद्यार्थीनींनी अनेक प्रकारचे पदार्थ बनवून त्या पदार्थांची सजावट केली होती. सोबतच सुंदर सुबक मेनूकार्ड तयार करून पदार्थ सादर केले. प्रा. डॉ. सबाने यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करून शंकांचे निरसन केले.

**आई आमच्या महाविद्यालयात, हिमोग्लोबिन, आहार व आरोग्य –**

दरवर्षीप्रमाणे महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे 'आई आमच्या महाविद्यालयात' या उपक्रमाअंतर्गत दिनांक ०३/०२/२०२० रोजी 'हळदी कुंकू', हिमोग्लोबिन आहार व आरोग्य या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. वंदना तागडे, उद्घाटक प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवई, प्रमुख पाहुण्या व वक्त्या प्रा. डॉ. किरण दुधे, दुधे क्लीनिक, कारंजा (घा.) या लाभल्या होत्या. सुत्र संचालन बि.ए. सत्र –६ ची विद्यर्थिनी पुजा हिंगवे हिने केले. गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सरिता राऊत यांनी कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक केले. हा उपक्रम राबविण्यामागचा हेतु सांगीतला. प्रा. डॉ. किरण दुधे यांनी मुली व महिलांना हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी घरगुती उपाय, योग्य, पुरक व सकस आहार, योग्य व्यायाम व विश्रांती, काय खावे, काय टाळावे यावर परिपूर्ण मार्गदर्शन केले. जास्त त्रास असल्यास डॉक्टरचा सल्ला गरजेचा आहे. मुली महिलांच्या आरोग्य विषयक समस्यांचे शंकानिरसर केले. प्रा. डॉ. वंदना तागडे यांनी विद्यार्थीनींनी सामाजिक भान ठेवणे गरजेचे आहे यासंबंधी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शाखांच्या एकुण २१७ विद्यार्थीनी व ४८ महिलांचा समावेश होता. बि. ए. सत्र –६ ची विद्यार्थीनी हर्ष दुधाने हिने आभार व्यक्त केले.

**गरजुंना पोषक आहाराचे वाटप –**

गृहअर्थशास्त्र विभागातर्फे गरजू व अंगणवाडीतील मुलांना दिनांक १७/०३/२०२० ते मार्च या कालावधीत 'पोषक आहाराचे वाटप' (खिचडी) करण्यात आले होते, विद्यार्थीनींनी बालक व महिलांना स्वच्छतेचा मंत्र व पोषक आहाराचे महत्व समजावून सांगीतले. या उपक्रमात बि. ए. सत्र सहाच्या एकूण २३ विद्यार्थीनी सहभागी होत्या.

या उपक्रमात विद्यार्थीनींनी आपल्या स्थानिक गावी १३२ गरजूंना पोषक आहाराचे वाटप केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, प्राध्यापक व प्राध्यापिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध गावातील मंडळींनी या उपक्रमाची स्तुती केली.

**कोरोनाच्या काळात संतुलित आहारावर मार्गदर्शन –**

कोरोना व्हायरसच्या संक्रमणापासून वाचण्याकरीता समाजात प्रेरणा व जागरूकता निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून गृहअर्थशास्त्र विभागातर्फे 'संतूलित आहाराने कोरोनावर मात' यावर प्रा. डॉ. सरिता राऊत यांनी बी. ए. गृहअर्थशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. कोविड–१९ च्या काळात एकुण ४५ विद्यार्थीनींनी आपल्या स्थानिक गावातील मंडळींना संतुलित आहारावर मार्गदर्शन केले. 'कडधान्य, फळे' भाज्यांचा करूया वापर, येणार नाही कोरोनाचे घरावर खापर 'विद्यार्थीनींना रोगप्रतिकारशक्ती वाढविण्याकरीता विटामीन सी युक्त संतुलित आहार पथ्य व घ्यावयाची काळजी, योगासने व्यायाम व विश्रांती यावर मार्गदर्शन केले.

''बाहेर गेलोच तर ! मास्क व सोशल डिस्टंसिंग पाळूया, कोरोनाला हरवूया'' विविध माध्यमे व स्लोगनव्दारे गावातील मंडळींना मार्गदर्शन करण्यात आले होते. या उपक्रमाची महाविद्यालयातील सर्वांनी व विविध गावातील मंडळींनी विद्यार्थीनींची स्तुती केली. गृहअर्थशास्त्र या अभ्यास मंडळाअंतर्गत संपन्न झालेल्या कार्यक्रम व उपक्रमांत अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले त्यात प्रामुख्याने आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, कला शाखा प्रमुख प्रा. डॉ. उल्हास राठोड, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा. डॉ. रविंद्र सोनटक्के व विज्ञान शाखा प्रमुख प्रा. डॉ. अमित याऊल, क्रीडा विभागप्रमुख प्रा. पी. एस. काळे, ग्रंथालय विभागप्रमुख श्री. विनय गुडधे, अधिक्षक श्री. जयंत निंभोरकर सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर कर्मचारी वृंद यांचे मी आभार मानते.

## फॅशन डिझायनिंग विभाग

महाविद्यालयातील कला शाखेतील इतर विषया सोबतच फॅशन डिझाईनिंग या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थीनींच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास करणे तसेच त्यांच्या मधील कला गुणांचा विकास करणे ज्यामुळे त्या महाविद्यालयातुन बाहेर पडतांना स्वयंरोजगार स्थापन करू शकतील किंवा आत्मनिर्भर बनण्यास त्यांना मदत मिळेल या उद्देशाने या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थीनींच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विभागाअंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

**अभ्यास मंडळ कार्यकारिणी पुढीलप्रमाणे**

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १. | कु. हर्षाली दुधाने | बी. ए. भाग – ३ | अध्यक्षा |
| २ | कु. आरती कुईके | बी. ए. भाग – ३ | उपाध्यक्षा |
| ३. | कु. बबली कुंभरे | बी. ए. भाग – ३ | सचिव |
| ४. | कु. जयश्री आमझिरे | बी. ए. भाग – २ | सदस्या |
| ५. | कु. रिता सरोदे | बी. ए. भाग – २ | सदस्या |
| ६. | कु. अंजली हजारे | बी. ए. भाग – २ | सदस्या |
| ७. | कु. स्नेहा भांगे | बी. ए. भाग – १ | सदस्या |
| ८ | कु. दिक्षा वंजारी | बी. ए. भाग – १ | सदस्या |

**नवजात शिशुंना कपड्यांचे मोफत वाटप –**

फॅशन डिझाईनिंग विभागाअंतर्गत प्रात्यक्षिकामध्ये तयार करण्यात येणाऱ्या कपड्यांचे वाटप नवजात शिशुंच्या स्थानिक ग्रामीण रूग्णालयामध्ये दिनांक ०६/०३/२०२० रोजी करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. सुनील पखाले, प्रा. डॉ. सरिता राऊत, प्रा. वैशाली वैद्य, सौ. रूपाली राऊत तसेच डॉ. करनाके व रूग्णालयातील इतर कर्मचारी देखील उपस्थित होते.

**अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना मोफत कपडे वाटप –**

दिनांक ०८/०२/२०२० रोजी कारंजा तालुक्यातील जुनापाणी (टॉवर) या गावातील अंगणवाडीतील मुलींना महाविद्यालयातील फॅशन डिझाईनिंग विभागाव्दारे मुलींनी तयार केलेल्या कपड्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी अंगणवाडी सेविका सौ. रत्नमाला केळझरकर, मदतनीस यशोदा डोंगरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे सर, फॅशन डिझायनिंग विभाग प्रमुख प्रा. वैशाली वैद्य, प्रा. डॉ. सरिता राऊत प्रा. डॉ. गणेश मोहोड, प्रा. डॉ. दिपक धारणे इ. उपस्थित होते.

**गृहिणी व मुलींना मोफत प्रशिक्षण –**

दिनांक ०२/१२/२०१९ ते १९/१२/२०१९ या कालावधीमध्ये फॅशन डिझाईनिंग विभागाव्दारे कारंजा तालुक्यातील व तालुक्यामध्ये येणाऱ्या इतर ग्रामीण भागातील मुलीं व महिला यांच्या करीता शिवणकलेचे मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. गृहिणी व मुलींना आपल्या फावल्या वेळेचा सदुपयोग करता यावा व त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा या उद्देशाने दरवर्षी महाविद्यालयामध्ये या प्रशिक्षणाचे आयोजन केले जात असते.

या प्रशिक्षणाच्या समारोपीय कार्यक्रमाला प्रा. डॉ. वंदना तागडे, प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई, प्रा. डॉ. सरिता राऊत, प्रा. वैशाली वैद्य व सर्व प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या.

**रेशीम उत्पादन विभागाला भेट –**

महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील प्राणीशास्त्र विभागा अंतर्गत रेशीम उत्पादन प्रक्रिया विभाग स्थापन करण्यात आलेला आहे. यामध्ये रेशीम कशा पद्धतीने तयार होते. या विषयीचे सखोल ज्ञान बी. ए. भाग १ च्या विद्यार्थीनींनी तेथे प्रत्यक्षरित्या जावुन त्याची माहीती जाणुन घेतली. या भेटी दरम्यान एकुण ५४ विद्यार्थीनी उपस्थित होत्या

**विद्यार्थी चर्चासत्र –**

दिनांक १७/१०/२०१९ ला विद्यार्थीनींनकरीता अभ्यासक्रमातील विविध विषयांवर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते जसे भारतातील पारंपारिक वस्त्रे, भारतातील पारंपारिक भरतकला इत्यादी मुद्यांचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये बी. ए. भाग ३ सेम ३ च्या विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

विद्यार्थीनींनी त्यांना दिलेल्या विषयांवर आपले वेगवेगळे मत मांडले व इतरही विद्यार्थीनींची मते जाणुन घेतली.

**व्याख्यान –**

फॅशन डिझाईनिंग या विषयाला असणाऱ्या बी. ए. भाग ३ च्या विद्यार्थीनींनकरीता गेस्ट लेक्चर चे आयोजन दिनांक ०५/०३/२०२० रोजी करण्यात आले. होते. यामध्ये त्यांच्या सहाव्या सेमीस्टरला असणाऱ्या अभ्यासक्रमावर आधारित मुद्द्यांचा समावेश करण्यात आलेला होता. ज्यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत मिळेल या उद्देशाने या गेस्ट लेक्चर चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी एकुण २८ विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

## राज्यशास्त्र विभाग

आपल्या महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय समाज विज्ञान शाखेमध्ये सुरूवातीपासूनच म्हणजे सन १९८९ पासूनच शिकविला जातो. हा विषय विद्यार्थ्यांमध्ये राजकीय चैतन्य व राजकीय जागृती निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो. प्रमाणे या विषयाकडे विद्यार्थ्यांनी आज करीअर म्हणून बघितल्यास एक चांगले करीअर म्हणून उपलब्ध आहे. त्यामुळे बरेच विद्यार्थी ऐच्छिक विषय असुन सूद्धा अध्ययनासाठी हा विषय प्राधान्याने घेतात.

सत्र २०१९–२०२० मध्ये प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. त्यासाठी प्रत्येक वर्गामधून दोन विद्यार्थ्यांची निवड त्याला मागल्या परीक्षेत मिळालेल्या गुण किंवा नेतृत्व करण्याची त्याची इच्छा या आधारे करण्यात आले. अभ्यास मंडळाचे गठन करीत असतांना त्याच्या कार्यपद्धतीबद्दल माहीती विद्यार्थ्यांना अवगत करण्यात आली. अभ्यास मंडळाचे उद्घाटन सामुहिकरित्या कला शाखा आयोजित करेल असे सांगण्यात आले. दिनांक १० ऑक्टों. २०१९ ते १८ ऑक्टों. २०१९ दरम्यान बी. ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र, समता, न्याय आणि अधिकार या विषयांवर चर्चासत्र तर बी. ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांनी 'भारतीय राजकारणातील वादग्रस्त मुद्दे' – जसे– जात, धर्म, भाषा या विषयावर चर्चासत्र तर बी. ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांनी इंग्लंड व अमेरिकन शासनपध्दती या विषयावर चर्चासत्र घडवून आणले.

## राज्यशास्त्र अभ्यास मंडळ २०१९-२०२०

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १. | राणासिंग बावरी | बी. ए. भाग - ३ | अध्यक्ष |
| २ | कु. पुजा हिंगवे | बी. ए. भाग - ३ | सदस्य |
| ३. | कु. लीना भादे | बी. ए. भाग - १ | सदस्य |
| ४. | नावेद पठान | बी. ए. भाग - १ | सदस्य |
| ५. | कु. पल्लवी टेकाडे | बी. ए. भाग - १ | सदस्य |
| ६. | सुमीत धांदे | बी. ए. भाग - १ | सदस्य |
| ७. | कु. मोनाली बारंगे | बी. ए. भाग - २ | सदस्य |
| ८ | डॉ. विजय काळे | बी. ए. भाग - २ | मार्गदर्शक |

त्याचप्रमाणे रा. से. यो. व राज्यशास्त्र अभ्यासमंडळाच्या वतीने २६ नोव्हें. २०१९ ला संविधान दिन साजरा केल्या गेला. तर २५ जानेवारी २०२० ला 'मतदार जागृती दिनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र अभ्यास मंडळ व विधी व न्याय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संविधान व इतर कायदे' यावर परिसंवाद दिनांक २८/०२/२०२० ला घेण्यात आला. हा परिसंवाद फक्त विद्यार्थ्यांसाठी होता. त्याला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद होता. १६/०३/२०२० पासून लॉकडाऊन मुळे सत्र समाप्तीची कामे ऑनलाईन पध्दतीने करण्याचा प्रयत्न झाला.

## इतिहास विभाग

महाविद्यालयात शिकणारा विद्यार्थी क्रमिक पुस्तके वाचून परिक्षार्थी न होता तो समाजाचा महत्वपूर्ण घटके बनावा या हेतुने महाविद्यालयात त्यांच्या व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने व्यासपीठ उपलब्ध करून दिल्या जाते. विषयाचे सारासार ज्ञान व्हावे, आजच्या स्पर्धेच्या यांत तो टिकावा, त्याची संशोधन वृत्ती वाढावी, वर्तमानकालीन घटनांकडे त्याला तटस्थपणे बघता यावे या दृष्टीने महाविद्यालयातील संबंधित विषयाचे नियोजन केले जाते.

याकरीता कला शाखा प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन अभ्यास मंडळ शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेतले जातात. त्या दृष्टीने अभ्यास मंडळ कार्यकारिणी गठित केल्या जाते. अभ्यास मंडळ कार्यकारिणी सदस्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर केली जाते. B. A. 1st Sem . B. A. 2nd Sem च्या विद्यार्थ्यांसाठी 'बौद्धधर्माची शिकवण व आजचा समाज' ' मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द' 'त्रीमंत्री योजना' 'व्दितीय महायुध्दाचे परिणाम' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान व्हावे, वाचनाची आवड निर्माण व्हावी, संशोधनवृत्ती वाढावी,आत्मविश्वास वाढावा याकरीता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. दिलेले विषय हे अभ्यासक्रमावर आधारीत असतात जेणेकरून तो विषय विद्यार्थ्यांना चांगला समजेल.

## इतिहास अभ्यासमंडळ कार्यकारिणी पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १. | कु. पुजा हिंगवे | बी. ए. भाग – ३ | अध्यक्ष |
| २ | राणासिंग बावरी | बी. ए. भाग – ३ | उपाध्यक्ष |
| ३. | अनिल ढोमणे | बी. ए. भाग – २ | सचिव |
| ४. | कु. वैशाली पाटमासे | बी. ए. भाग – १ | कोषाध्यक्ष |
| ५. | पवन देवासे | बी. ए. भाग – १ | सदस्य |
| ६. | कु. पल्लवी टेकाडे | बी. ए. भाग – १ | सदस्य |
| ७. | ऋषभ आमले | बी. ए. भाग – १ | सदस्य |

हा दृष्टीकोन लक्षात घेवून ०९/१०/२०१९ B. A. 1st Sem च्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राला ६२ विद्यार्थी उपस्थित होते. B. A. 3rd Sem च्या विद्यार्थ्यासाठी ०७/१०/२०१९ ला ३२ विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. B. A. 5th Sem च्या विद्यार्थ्यांसाठी २५/१०/२०१९ ला चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले या चर्चासत्राला २५ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच या विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

**प्रश्नमंजुषा –**

नागपुर विद्यापीठाने सत्र २०१६-१७ पासुन सेमिस्टर परीक्षा पध्दती लागू केलेली आहे. यामध्ये अंतर्गत मूल्यमापन २० यामध्ये अंतर्गत मूल्यमापन २० गूण व ८० गुण विद्यापीठ परिक्षेकरीता ठेवण्यात आले आहे. या परीक्षेतील प्रश्न पत्रिकेचे स्वरूप लक्षात घेता या परीक्षेत संक्षिप्त प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न सखोल अभ्यासाअंती सोडविल्या जावू शकतात. विद्यार्थ्यांना हे प्रश्न सोडविता यावे म्हणून प्रत्येक प्रकरणानंतर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांची उत्तरे सांगितली जाते. या पध्दतीने अभ्यासाची तयारी केली जाते. हा उपक्रम स्पर्धा परिक्षेसाठी सुध्दा विद्यार्थ्यांना फायद्याचा ठरतो. यादृष्टीने B. A. 2nd Sem च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम दिनांक ०३/०३/२०२० ला ६० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेण्यात आला तसेच B. A. 4th Sem करीता २७/०२/२०२० ला ३० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.

**शैक्षणिक सहल –**

मानव व निसर्ग यांचा अगदी जवळचा संबंध आहे. जोपर्यंत निसर्गाचे भान ठेवून विद्यार्थी वावरणार नाही तोपर्यंत कितीही भौतिक प्रगती झाली तरी अर्थ उरणार नाही. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना आपली संस्कृती टिकवण्यासाठी स्थानिक इतिहासाचे ज्ञान देणे गरजेचे ठरते. या दृष्टीने निसर्गरम्य खैरी गावालगतच्या धरणावर विद्यार्थ्यांना दि. ०४/१०/२०२० ला नेण्यात आले. या सहलीमध्ये चे विद्यार्थी सहभागी झाले होते. यांची संख्या जवळजवळ ७० होती. सोबत प्रा. डॉ. पखाले, प्रा. डॉ. राठोड, प्रा. डॉ. मेंढे, प्रा. डॉ. गावंडे, प्रा. डॉ. सरिता राऊत होत्या. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी आनंद घेवून स्थानिक इतिहास समजून घेतला. तर काही इतिहास शिक्षकांकडून समजून घेतला. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. वंदना तागडे यांनी विद्यार्थ्यांना स्थळाबद्दल माहिती दिली.

**कार्यशाळा परीक्षेला सामोरे जातांना –**

महाविद्यालयात दि. ०८/१०/२०१९ ला बी. ए. च्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसंबंधी माहीती देण्यासाठी 'परीक्षेला सामोरे जातांना' या शिर्षकाखाली कार्यक्रम घेण्यात आला. पदवी स्तरावर विद्यार्थी महाविद्यालयात शिकायला आल्यानंतर त्यांना अभ्यासक्रम, प्रश्नांचे स्वरूप,पेपरचा कालावधी व इतरही महत्वाच्या बाबी यांचे ज्ञान नसते त्यामुळे तो ऐन वेळेवर गांगावून जातो. असे होऊ नये, वर्षभर त्याने केलेल्या परिश्रमाचे योग्य फळ त्याला मिळावे म्हणून त्यांच्याकरीता अशा कार्यशाळेचे आयोजन अभ्यासक्रम पूर्ण शिकविल्यानंतर केल्या जाते. त्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केल्या जाते.

**डॉ. संजय धनवटे**
प्राचार्य

**डॉ. उल्हास राठोड**
(कला शाखा प्रमुख)

# वाणिज्य विभाग

महाविद्यालयातील वाणिज्य विभाग सतत विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबवित असतो. महाविद्यालयीन जीवनामध्ये क्रियाशील विद्यार्थी पाठ्यक्रमाबरोबर इतरही क्षेत्राची ओळख करून घेतात. एक सक्षम व समर्थ पदवीधर म्हणून तो विद्यार्थी महाविद्यालयाबरोबर पडावा या प्रामाणिक हेतूने संपूर्ण विविधांगी उपक्रम राबविण्यात आले. त्या ह्या लेखाजोखा खालिलप्रमाणे

### १. Bridge Course सेतू अभ्यासक्रम – (२० जून ते ३० जून २०१९)

महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेला प्रवेश घेणारे विद्यार्थी हे वेगवेगळ्या शाखांमधून आलेले असतात. कला, विज्ञान व एम. सी. व्ही. सी. या शाखांमधून आलेल्या विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेतील बेसिक संकल्पनांची ओळख होण्याकरीता वाणिज्य विभागामार्फत सेतू अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

वाणिज्य शाखेतील विविध संकल्पना, बारकावे, नोकरीच्या संधी इत्यादी बद्दल माहिती देण्यात आली. तसेच वेगवेगळ्या प्राध्यापकांनी आपआपल्या विषया अंतर्गत संकल्पना देखील विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. एकदम क्रमिक अभ्यासक्रमाला हात न घालता विद्यार्थ्यांच्या मनातील वाणिज्य शाखेची भिती दूर करणे हाच प्रामाणिक उद्देश या सेतू अभ्यासक्रम आयोजनामागील होता. याकरीता मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### २. महाविद्यालयाची ओळख कार्यक्रम संपन्न – (दिनांक –१५/०७/२०१९)

नविन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाची ओळख विद्यार्थ्यांना होण्याकरीता महाविद्यालयातर्फे ओळख महाविद्यालयाची कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे तर प्रमुख पाहुणे म्हणून सर्व शाखांचे शाखाप्रमुख उपस्थित होते.वाणिज्य शाखेसंदर्भात माहिती प्रा. डॉ. रविंन्द्र सोनटक्के यांनी दिली सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पुष्पांजली बिडवाई यांनी सांस्कृतिक विभागाची माहिती दिली. शारीरीक विभाग प्रमुख प्रा. प्रमोद काळे यांनी त्यांच्या विभागाची माहिती दिली. प्रा. डॉ. अविनाश कदम यांनी IQAC विभागाची माहिती सांगीतली वेगवेगळ्या विभाग प्रमुखांनांनी त्यांच्या शाखाअंतर्गत आयोजित कार्यक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवचटे यांनी महाविद्यालयातील शिस्ती संदर्भात व संपूर्ण महाविद्यालयाबद्दल माहिती प्रदान केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. दर्शनकुमार चांभारे यांनी तर प्रास्ताविक डॉ. सुनिल पखाले तर आभार प्रदर्शन डॉ. उल्हास राठोड यांनी केले.

### ३. बिजारोपन व वृक्षारोपन कार्यक्रम – (दिनांक १४/०८/२०१९)

वाणिज्य विभागातर्फे वसुंधरा बचाव रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत कारंजा (घा) शहराच्या नजिकच्या टेकडीवर सीडस बॉल या नाविण्यपूर्ण वृक्षारोपण व बिजारोपन करण्यात आले. सोबतच काही वृक्षांचे देखील रोपण करण्यात आले. तत्पूर्वी महाविद्यालयातून वृक्षारोपन करण्यात येणाऱ्या स्थळापर्यंत रॅली काढण्यात आली. दरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरण वाचवा या संदेशाअंतर्गत नारे देत परिसर दुमदुमुन सोडला व नियोजन स्थळ गाठून त्या ठिकाणी वृक्षारोपन व बिजारोपन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. संजय धनवटे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. रविंन्द्र सोनटक्के, IQAC समन्वयक डॉ. अविनाश कदम, प्रा. डॉ. गणेश मोहोड, प्रा. सुरेश गोडबोले, प्रा. डॉ. दिपक धारणे, व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

४. **खैरी धरण भेट कार्यक्रम व वनभोजन (दिनांक १४/१०/२०१९)**

कारंजा (घा.) लगतच्या खैरी या गावामध्ये असणाऱ्या छोट्या धरणाला वाणिज्य विभागाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी भेट दिली. महाविद्यालयातून सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांनी नजिकच्या धरणाला भेट देऊन तेथील वातावरणाचा आनंद लुटला. या दरम्यान विद्यार्थ्यांनी धरणावरून फेरफटका मारत फोटो काढले, धरणावरून पाण्याचा ओव्हरफ्लो वाहत होता.

नंतर विद्यार्थ्यांनी भोजन केले. तत्पूर्वी काही विद्यार्थ्यांनी नृत्य करून आनंद लुटला. त्यानंतर सर्वांनी भोजन केले. भोजन केल्यानंतर विद्यार्थ्यांनी कविता, गाणी इत्यादी सुप्त गुण सादर केले. नंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे प्रयाण केले. याप्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. रविन्द्र सोनटक्के, प्रा. डॉ. अविनाश कदम, प्रा. सुरेश गोडबोले, कला शाखा प्रमुख डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. सुनिल पखाले, प्रा. डॉ. महेन्द्र गावंडे, प्रा. डॉ. वंदना तागडे, प्रा. डॉ. राऊत, प्रा. धारणे, प्रा. दर्शन चांभारे, प्रा. कु. ढोबाळे इत्यादी प्राध्यापक व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

५. **BCM या विषयावर गटचर्चा (१७/१०/२०१९)**

बी. कॉम. III सेमीस्टर -३ च्या विद्यार्थ्यांकरीता BCM (Business Communication Management) या विषयाअंतर्गत प्रा. डॉ. रविंन्द्र सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी BCM या विषयावर गटचर्चा (Group Discussion) केली गटचर्चेअंतर्गत विद्यार्थ्यांनी BCM विषयातील वेगवेगळ्या विषयावर आपले सादरीकरण केले. गटचर्चेनंतर बऱ्याचश्या विद्यार्थ्यांनी तयारी करून आणलेल्या भागावर सादरीकरण देखील केले सादरीकरणादरम्यान बाकी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे देखील दिली. शेवटी प्रा. डॉ. रविन्द्र सोनटक्के यांनी विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या भागाचे सखोलपणे सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

६. **परिक्षा पूर्व मार्गदर्शन कार्यशाळा : दिनांक १८/१०/२०१९**

वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यापीठ हिवाळी परिक्षा २०१९ ला सामोरे जातांना त्यांना परिक्षेसंदर्भात मार्गदर्शन करण्याकरीता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते कार्यशाळेच्या सुरूवातीला वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. रविन्द्र सोनटक्के यांनी परिक्षा पध्दती व उत्तरपत्रिकेसंदर्भात संपुर्ण माहिती प्रस्तृत केली. सोबतच PPT व्दारे सखोल मार्गदर्शन केले प्रा. डॉ. गणेश मोहोड यांनी मराठी विषयासंदर्भात मार्गदर्शन केले व पेपर कसा सोडवायचा हे सांगीतले प्रा. सुरेश गोडबोले व प्रा. दर्शन चांभोरे यांनी आपआपल्या विषया अंतर्गत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले व वेळेच्या व्यवस्थापनासंदर्भात देखील मार्गदर्शन केले. कार्यशाळेकरीता प्रा. कु. ढोबाळे मॅडम व मोठ्या प्रमाणात वाणिज्य विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

७. **दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद (दिनांक १४/१२/२०१९)**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज कारंजा (घा.) येथील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय अर्थव्यवस्थेचे पाच ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्‌घाटन अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या हस्ते झाले तर अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष ॲड. दिलीपराव काळे लाभले होते. बिजभाषक म्हणून प्रा. डॉ. विनायक देशपांडे, श्री. यमाजी मालकर, श्री. विजय जावंधिया, श्री. विजय जाधव, प्रा. डॉ. राजेंद्र भांडवलकर, प्रा. रामकृष्ण टाले यांची दोन दिवस उपस्थिती होती.

दोन दिवस चाललेल्या परिषदेमध्ये ॲड. शोभाताई काळे, आमदार मा. श्री. दादारावजी केचे, श्री. प्रदिपराव काळे, प्रा. डॉ. श्यामसुंदर भुतडा, श्री. संदिपभाऊ काळे, प्रा. डॉ. आर. जी. भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवस चाललेल्या परिषदेच्या वेगवेगळ्या सत्राचे संचालन प्रा. डॉ. गणेश मोहोड, प्रा. डॉ. अविनाश कदम, प्रा. डॉ. रविन्द्र सोनटक्के, प्रा. डॉ. हेमराज चौधरी, प्रा. दर्शनकुमार चांभारे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. डॉ. मिलींद पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिपक चव्हाण, प्रा. डॉ. पुरूषोत्तम माळोदे, प्रा. डॉ. सुनिल पखाले, प्रा. डॉ. सुधाकर भुयार, प्रा. डॉ. श्यामप्रकाश पांडे, यांनी केले सदर परिषदेकरीता माळोदे, डॉ. हरीभाऊ वेरूळकर प्राचार्य, प्रा. डॉ. संजय धनवटे, प्रा. डॉ. विरेन्द्र जगताप, प्रा. डॉ. संजय धनविजय, प्रा. डॉ. महेन्द्र गावंडे, प्रा. डॉ. सुरेश गोडबोले व मोठ्या प्रमाणात प्राध्यापक व प्राध्यापिका उपस्थित होत्या.

### ५. MBA मार्गदर्शन कार्यशाळा (दिनांक १९/०१/२०२०)

वाणिज्य विभाग व महाविद्यालयातील Placement & Guidance Cell च्या संयुक्त विद्यमाने MBA मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होता. याप्रसंगी नबिरा महाविद्यालय काटोल येथील व्यवस्थापन शाखा प्रमुख प्रा. डॉ. हितेश वासवानी व प्रा. डॉ. अतुल चरडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रमोद काळे होते. त्यासोबतच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारकपणे उत्तरे दिलीत पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. रविंन्द्र सोनटक्के यांनी करून दिला. या प्रसंगी प्रा. डॉ. सुरेश गोडबोले, प्रा. विजय राघोर्ते व प्रा. दर्शन चांभारे व मोठ्या संख्येने वाणिज्य व विज्ञान शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## वाणिज्य अभ्यास मंडळ २०१९-२०२०

| अ.क्र. | नाव | पद | वर्ग |
|---|---|---|---|
| १. | कु. नूतन चानपुरे | अध्यक्ष | बि. कॉम. V सेमिस्टर |
| २. | राहुल सातपुरे | उपाध्यक्ष | बि. कॉम. I सेमिस्टर |
| ३. | कु. श्रध्दा घागरे | सचिव | बि. कॉम. III सेमिस्टर |
| ४. | पवन पाटिल | सहसचिव | बि. कॉम. V सेमिस्टर |
| ५. | क्षितीज भांगे | कोषाध्यक्ष | बि. कॉम. III सेमिस्टर |
| ६. | कु. जयरी बारंगे | सदस्य | बि. कॉम. V सेमिस्टर |
| ७. | कु. भावना चौधरी | सदस्य | बि. कॉम. V सेमिस्टर |
| ८. | कु. योगीता सावरकर | सदस्य | बि. कॉम. V सेमिस्टर |
| ९. | कु. कोमल खवसे | सदस्य | बि. कॉम. III सेमिस्टर |
| १०. | भुषण बारई | सदस्य | बि. कॉम. III सेमिस्टर |
| ११. | कु. अंकीता ढोबाळे | सदस्य | बि. कॉम. III सेमिस्टर |
| १२. | कु. काजल डोंगरे | सदस्य | बि. कॉम. I सेमिस्टर |
| १३. | कु. सारिका कावडकर | सदस्य | बि. कॉम. I सेमिस्टर |
| १४. | कुणाल मोहोड | सदस्य | बि. कॉम. I सेमिस्टर |
| १५. | अक्षय मदनकर | सदस्य | बि. कॉम. I सेमिस्टर |

समन्वयक : १. निलेश चरडे — बि. कॉम. V सेमिस्टर
२. वेदांत गोतमार — बि. कॉम. III सेमिस्टर
३. विरेंन्द्र चौधरी — बि. कॉम. I सेमिस्टर

**डॉ. रविंन्द्र सोनटक्के**
वाणिज्य विभाग प्रमुख

**डॉ. संजय धनवटे**
प्राचार्य

# FACULTY OF SCIENCE

## Academic Programme

The faculty of science was established in the session 2005-06; offer a full time three year (Six Semester) teaching course leading to bachelor degree in science (B.Sc.). The course has two group viz; chemistry, botany & zoology (CBZ) and physics, chemistry & mathematics (PCM). The syllabi of all subjects are designed by university as per need of academic and the guidelines given by UGC.

## Students Strength 2019-20

| Subject/ Class | SEM I/II | SEM III/IV | SEM V/VI | Total |
|---|---|---|---|---|
| **Chemistry** | 78 | 82 | 129 | 289 |
| **Zoology** | 45 | 51 | 67 | 163 |
| **Botany** | 45 | 51 | 67 | 163 |
| **Physics** | 33 | 31 | 62 | 126 |
| **Maths** | 33 | 31 | 62 | 126 |
| **Marathi** | 78 | - | - | 96 |
| **English** | 78 | - | - | 96 |

## Students Achievements

The following students secured maximum marks in WIN-2018 & SUM-2019 RTMNU, Nagpur University Examination.

दिनांक १४ एप्रिल २०२० रोजी महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आले. डॉ. उमेश मेश्राम व अजय लोणकरव राहुल देशमुख उपस्थित होते.

**डॉ. संजय धनवटे**
**प्राचार्य**

**प्रा. डॉ. पुष्पाजली बिडवई**
**समन्वयक**

****

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

आमचे नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज (कला, वाणिज्य व विज्ञान) कारंजा (घा.) जि. वर्धा हे नागपुर – मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर डोंगर कुशीत असलेल्या कारंजा (घाडगे) या छोट्या शहरवजा गावात १९८९ पासून अविरतपणे ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. आमच्या महाविद्यालयात कला,वाणिज्य व विज्ञान शाखा कार्यरत असून २०१०–११ पासून राष्ट्रीय सेवा योजना विभागांर्तगत रेड रिबन क्लब ची स्थापना करण्यात आली. ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने आमच्या महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग सतत प्रयत्नशील असतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणिव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या नियमित कार्यक्रमांमध्ये २०० विद्यार्थ्यांनी नोंदणी असून त्यापैकी १०० विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरा करीता निवड करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय एकात्मता, अनुशासनप्रियता व शिस्त या गुणांचा स्वयंसेवकांना परिचय व्हावा, यादृष्टीने आमच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने संपूर्ण वर्षभर जास्तीत जास्त सृजनात्मक उपक्रम राबविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तसेच यावर्षी जुनापाणी (टॉवर) ता. कारंजा (घा.) जि. वर्धा येथे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर स्वच्छ भारत व युवाशक्ती अभियान या संकल्पनेवर आधारीत दि. ०३ फेब्रुवारी २०२० ते दि. ०९ फेब्रुवारी २०२० ला आयोजित करण्यात आले. यामध्ये १०० स्वयंसेवकांना सहभागी करण्यात आले होते.

सन २०१९–२० या सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली २९ जून २०१९ ला नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध विषयांवरील कार्यक्रमांबाबत चर्चा करून वार्षिक कार्यनियोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपली मते मांडली.

**राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम** National Service Scheme Regular Program (2019 - 20) **जागतिक योग दिन** (World Yoga Day)

भारताच्या प्रस्तावानुसार संयुक्त राष्ट्राने २१ जून हा जागतिक योग दिन साजरा करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली. या दिवसाचे औचित्य साधून आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. प्रमोद काळे (शारीरिक शिक्षण विभाग) प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी ) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी जागतीक योग दिन या कार्यक्रमाचे आयोजन केले प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. सुनिल पखाले उपस्थित होते. शारीरीक व मानसिक अनारोग्याचे निवारण व्हावे यासाठी नियमित योगासणे करणे गरजेचे असून योगासनाचे महत्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अविनाश कदम यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**वृक्षारोपन अभियान** (Plantation Drive)

राज्य शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम अंतर्गत दिनांक ०८ जुलै २०१९ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) यांनी वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. निसर्गाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने महत्व अनन्यसाधारण आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्वयंसेवकांनी वृक्षारोपन

केले. या कृतीशिल उपक्रमांमध्ये सर्व रा. से. यो. चे स्वयंसेवक सहभागी झाले होते. या प्रसंगी प्रथम स्वयंसेवकांना पर्यावरणाचे महत्व सांगण्यात आले.

मानवी आरोग्य व पर्यावरण यांचा सहसंबंध पटवून देण्यात आला. स्वयंस्फूर्तीने वृक्षारोपनासाठी स्वयंसेवकांना प्रेरीत करून नंतर महाविद्यालयात वृक्षारोपन करण्यात आले. तसेच पाणी फाऊंडेशन कारंजा तथा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने याच दिवशी सर्व विद्यार्थी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या उपस्थितीत कारंजा घा. शेजारील टेकडीवर बियाणे तसेच सिडबॉल रोपन करण्यात आले. ह्या कार्यक्रमास प्रा. डॉ. अविनाश कदम तसेच सर्व प्राध्यापक कर्मचारी व रा. स. यो. स्वयंसेवक यांनी भाग घेतला.

**आरोग्य जनजागरण मोहिम** (Health Awareness Programe)

जून–नोव्हेंबर या कालावधित किटकजन्य आजार यामध्ये प्रामुख्याने हिवताप, डेंग्यु चिकनगुन्या, जेई, हत्तीरोग इत्यादी तसेच यासारख्या आजारांचा समावेश होतो. हे आजार वाढीस लागण्याचे प्रमुख कारणे म्हणजे झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, दळणवळणांच्या साधनांमध्ये झालेली वाढ वातावरणात होत असलेला बदल, पावसाचा अनियमितपणा, सांडपाण्याची अयोग्य विल्हेवाट, तसेच डासांची प्रतीकार शक्ती वाढणे आणी मानवाची बदललेली जीवनशैली, झपाट्याने होणारी वृक्षतोड इत्यादी कारणे आहेत. किटकजन्य आजारांपैकी हिवताप हा आजार सोडल्यास उर्वरीत डेंग्यू, चिकनगुन्या आणि  ह्या आजारांवर रामबाण औषध अजूनही उपलब्ध नाही. त्यामुळे ह्या आजारापासून प्रतिबंध करणे हा एकच उपाय आहे. वरील सर्व उपायांमुळे किटकजन्य आजारांपासून नागरीकांना दिलासा मिळू शकेल व रोगमुक्त राहणे सहज शक्य होईल, असे या बद्दलच्या माहितीची पत्रके वाटून नागरीकांना आवाहन करण्यात आले.

**जागतिक लोकसंख्या दिन** (World Population Day) **व तंबाखु मुक्ती दिन** (Anti Tobaco Day)

११ जुलै हा दिवस लोकसंख्या दिन तथा तंबाखु मुक्ती दिन म्हणून जगभर साजरा केल्या जातो. या दिवसाचे औचित्य साधून आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.डॉ.प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) प्रा. डॉ. प्रा. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. गौतम वाकडे (समन्वयक, निरंतर व प्रौढ शिक्षण विभाग) यांनी जागतिक लोकसंख्या दिन या कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवई ह्या प्रमुख वक्ते म्हणुन उपस्थित असून त्यांनी लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम व लोकसंख्या नियंत्रण ही काळाची गरज या विषयावर व्यक्त केले व तसेच बर्थ कंट्रोल क्लिनिक बद्दल माहिती दिली. तसेच या दिवशी प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या हस्ते वर्षभर चालणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनपा विभागाच्या नियमित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच १२ जुलै रोजी तंबाखु मुक्ती दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी यांनी तंबाखू मुक्ती शपथ घेतली. प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना तंबाखु सेवन चे दुष्परिणामाची माहिती दिली.

**राष्ट्रीय जंतनाशक दिन** (National Deworming Day)

दिनांक ०८ ऑगष्ट २०१९ रोजा राष्ट्रीय जंतनाशक दिन पाळण्यात आला. आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या दिवशी १६ वर्षा खालील विद्यार्थ्यांसाठी जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. विविध जंतासाठी ह्या गोळ्यांचा उपयोग होतो. सदर गोळ्या महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील सर्व भाग १ च्या विद्यार्थ्यांना गोळ्याचे वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ. संजय धनवटे, सर्व प्राध्यापक, शिक्षकत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. डॉ. प्रविण कळे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना जंतनाशक गोळ्यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**क्रांती सप्ताह** (Kranti Saptah)

दिनांक ०९ ऑगष्ट २०१९ ते १५ ऑगष्ट २०१९ या कालावधीत क्रांती सप्ताह पाळण्यात आला. या सप्ताहात शहिदांनी देशासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये प्राचार्य डॉ. संजय धनवटे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते, सोबतच या कार्यक्रमामध्ये वृक्षारोपण, वृंक्षांना आळे, संरक्षण कठडे लावणे व पाणी देणे इत्यादी कार्य करण्यात आले.

**आंतरराष्ट्रीय युवा दिन** (International Youth Day)

दिनांक १२ ऑगश्ट २०१९ ला आंतरराष्ट्रीय युवा दिन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे ( कार्यक्रम अधिकारी) व्याख्यान आयोजीत करण्यात आले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. गौरव पेठे उपस्थित होते. यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिन चे महत्व विद्यार्थ्यांना सांगीतले तसेच आजचा युवक व सामाजिक बांधिलकी या विषयावर प्रकाश टाकला. प्राचार्य डॉ. संजय धनवटे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.

**उदबोधन वर्ग** (Orientation Program)

दिनांक १७ ऑगष्ट २०१९ ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन केले. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. मोहन मेंढे व प्रा. डॉ. गौरव पेठे उपस्थित होते. प्रा. डॉ. मोहन मेंढे यांनी आपल्या देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास धडविण्यामधण्ये राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्वाची भूमिका दिसुन येते. देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रिय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातुन होत आहे, यावर स्वयंमसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अमित याऊल तसेच आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिपक धारणे यांनी केले. कार्यक्रमांचे सुत्रसंचालन कु. ऋतुजा धांदे हिने केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**माहिती दुत प्रकल्प** (Online-Mahiti Doot Project)

ऑगष्ट २०१९ महिण्यात अनुलोम सामाजिक संस्था तथा महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त उपक्रमातुन माहिती दुत प्रकल्प राबविण्यात आला. सदर प्रकल्पासाठी अनुलोम च्या वतीने श्री अमोल यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील स्वयंसेवक यांच्या मोबाईल मध्ये एक ॲप डाऊनलोड करण्यात आले. सदर ॲप मध्ये स्वयंसेवकांनी आपली माहिती भरून पुढे ते सुरू केले. ह्या प्रकल्पामध्ये या मोबाईल ॲप व्दारे राज्य शासन व केंद्र शासन व्दारा सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती लोकांना द्याची असते. ती माहिती स्वयंसेवकांनी लोकांना दिली ज्या स्वयंसेवकांनी असे कमीत कमी ५० लोकांना माहिती दिली की राज्य शासनाव्दारे मुख्यमंत्र्यांच्या सहीनीशी एक प्रमाणपत्र मिळाले. असे एकुण ७० स्वयंसेवकांनी या प्रकल्पाव्दारे एकूण ३५०० लोकांना विविध सरकारी योजना ज्या या लोकांसाठी सरकार व्दारे सुरू आहे. त्यांची माहिती देण्यात आली.

व एकुण ७० स्वयंसेवकांना डिजीटल प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रकल्पासाठी प्राचार्य डॉ. संजय धनवटे, प्रा. डॉ. प्रविण काळे ( कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**रोकड विरहीत कार्यशाळा** (Cashless Transaction Workshop)

दिनांक २१ ऑगष्ट २०१९ रोजी महाविद्यालयात 'रोकड' विरहीत व्यवहार कार्यशाळा घेण्यात आली. केंद्रसरकार तथा राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार रोकड विरहीत व्यवहाराचा प्रचार आणि प्रसार करण्याकरीता रोकड विरहित व्यवहार करण्यावर भर दिल्या जात आहे. याच करीता जास्तीत जास्त लोकांनी रोकड विरहीत व्यवहार आत्मसात करण्याकरीता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन वर्धा डाक विभागातील अधिकारी आले होते तसेच महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. अविनाश लोहे कार्यक्रमाला हजर होते. ह्या वेळी डाक विभागातील अधिकारी ह्यांनी स्वयंसेवकांना रोकड विरहीत व्यवहार या विषयावर मार्गदर्शन केले तसेच उपस्थित स्वयंसेवकांना इंडीया पोष्ट पेमेंट बँक हे मोबाईल ॲप डाऊनलोड करून पोष्टल बँक अकाऊंट नंबर तसेच पोष्टल बँक कार्ड दिले त्याव्दारे ऑनलाईन आर्थिक व्यवहार केला जातो. एकूण ७२ स्वयंसेवकांना हे आकाऊंट काढून देण्यात आले या कार्यशाळेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियान** (Cleanliness Campaign)

दिनांक २४ ऑगष्ट २०१९ व दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ ला प्रा. डॉ. प्रविण काळे ( कार्यक्रम अधिकारी) व प्रा. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) राष्ट्रिय सेवा योजना विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली महाविदयालय परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये महाविद्यालय परिसर व आजूबाजुच्या परिसरातील गाजर गवत निर्मूलन, केरकचरा व प्लास्टीक उचलून परिसर स्वच्छ करण्यात आला. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांच्या उपाययोजनेसाठी स्वच्छता कशी महत्वपूर्ण आहे, याची माहिती या उपक्रमातून विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

**आंतरराष्ट्रिय साक्षरता दिन** (International Literacy Day)

निरक्षर असलेल्या लोकांना साक्षरतेची संधी मिळावी म्हणून युनेस्को च्या वतीने दरवर्षी ०८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून आंतरराष्ट्रिय साक्षरता दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान प्रा. डॉ. अमित याऊल यांनी भूषविले या प्रसंगी प्रा. डॉ. गौरव पेठे यांनी मार्गदर्शन करतांना सांगीतले की, निरक्षरता हा मानवाच्या जीवनातील सर्वात मोठा अभिशाप आहे. साक्षरता म्हणजे फक्त वाचन-लेखन करता येणे किंवा पदवी संपादन करणे नव्हे. तर लोकांचे हक्क, अधिकार, कर्तव्याची जाणीव, कौशल्य विकास, समाजात विकासाकरीता योगदान देण्याची भावना निर्माण करणे म्हणजे साक्षरता होय, याबद्दलचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर व विद्यार्थी उपस्थित होते.

**पुरग्रस्त मदत कार्य** (Flood Relief Work)

देशात तसेच महाराष्ट्रात सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे देशात तसेच राज्यात अनेक जिल्हयांचा संपर्क तुटला होता. तसेच अनेक भागात अतिवृष्टी मुळे अनेक भागातील घरातील सर्व सामान वाहुन गेले होते. त्यासाठी रा. स. यो तर्फे पुरग्रस्त

मदत कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले होते. होते. विदर्भातील दुर्गम तथा अतिमागास भागात पुरपरिस्थीती भयावह झाली होती. असेच एक गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथे महाविद्यालयातर्फे पुरग्रस्तांना तात्काळ मदत म्हणुन जीवनावश्यक वस्तु तसेच कपड्यांचे मदत करण्यात आली. ह्या साठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मदतनिधीमधुन जीवनाश्यक वस्तुंचे पाकीट तयार करून ते रा. स. यो. विभाग नागपुर येथे पाठविण्यात आले. तसेच आवश्यक असणारे स्वच्छ, धुतलेले कपडे गोळा करून ते सुध्दा पाठविण्यात आले. एकुण १२००० रूपये गोळा झाले त्या निधिमधुन एकुण १०० पाकीट तयार करण्यात आले होते. या कार्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, प्रा. डॉ. प्रविण काळे ( कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) तथा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

**रक्तदान शिबिर** (Blood Donation Camp)

दिनांक १८ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब च्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांसह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व गावकरी बंधुंनी रक्तदान केले. शिबिरात एकूण ३५ दात्यांनी रक्तदान केले.यासाठी आयुष ब्लड बँक, धंतोली, नागपुरचे मेडीकल ऑफीसर डॉ. रवि भांगे व त्यांची चमू उपस्थित होती. या रक्तदान शिबिराचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. डॉ. प्रविण काळे प्रा. डॉ. दिपक धारणे, रेड रिबन क्लब समन्वयक प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या रक्तदान शिबिरास डॉ. गणेश मोहोड, प्रा. डॉ. प्रमोद काळे, प्रा. डॉ. अविनाश कदम, प्रा. डॉ. उमेश मेश्राम, प्रा. डॉ. गौरव पेठे, प्रा. डॉ. विनय गुडधे, प्रा. डॉ. रविंद्र सोनटक्के, प्रा. डॉ. सुनिल पखाले, प्रा. डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. पल्लवी उल्हे, प्रा. डॉ. विजय राघोर्ते, महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी, माजी विद्यार्थी तसेच गावकरी बंधुंनीसहकार्य केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांनी भुषविले व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई यांनी केले.

**उद्‌बोधन वर्ग** (Orientation Programe)

दिनांक १९ सप्टेंबर २०१९ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन केले. प्रमुख वक्ते म्हणुन प्रा. डॉ. अमित याऊल उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे समाजात जाऊन माणसांची मने जाणता येतात. कारण प्रेमापेक्षा अश्रुंचे नाते अधिक घट्ट असते. हे काम करणारे राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग म्हणजे दोन ह्रदयांचा सुसंवाद होय यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना दिन (सप्ताह)** (National Service Scheme Week)

या सप्ताह दरम्यान २७ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन २४ सप्टेंबर निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे व प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई प्रा. डॉ. विजय राघोर्ते, प्रा. डॉ. गौतम वाकडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) तसेच आभार प्रा. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी केले दिनांक २४/०९/२०१९ ते ०२/१०/२०१९ या दरम्यान वादविवाद स्पधा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**गांधी जयंती (अहिंसा सप्ताह)** (Gandhi Jayanti)

अहिंसा सप्ताह दरम्यान दिनांक ०२/१०/२०१९ ला रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे व प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ.  दिपक धारणे उपस्थित होते. या प्रसंगी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. दिनांक ०२ ते ०८ ऑक्टोबर २०१९ या दरम्यान अहिंसा या सप्ताह मध्ये गांधी विचार व राष्ट्रीय सेवा योजना परिसर स्वच्छता व आरोग्य इत्यादी विविध विषयांवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**मतदान जनजागृती कार्यक्रम** (Voting Awarness Program)

लोकांमध्ये मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य निवडणूक विभाग तसेच पंचायत समिती कारंजा घा. व विविध महाविद्यालय व शाळांव्दारे मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयामध्ये रा. स. यो. विभागाव्दारे सुध्दा अनेक कार्यक्रम घेण्यात आले. विविध जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले जसे की प्रभातफेरी, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, पोस्टर स्पर्धा दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजी कारंजा च्या विविध भागातुन प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. ह्या प्रभात फेरीमध्ये महाविद्यालयातील एकूण २१३ विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भाग घेतला होता. दिनांक १० सप्टेंबर २०१९ रोजी या सर्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये एकुण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) व प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) तथा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

**संविधान दिन व सांप्रदायिक सद्भावना दिन** (The Constitution Day)

दिनांक २६ नोव्हेंबर २०१९ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत संविधान दिन व सांप्रदायिक सद्भावना सप्ताह या निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे व प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. उमेश मेश्राम यांनी संविधानाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. तसेच सामुहिकरित्या संविधान प्रस्तावना चे वाचन करण्यात आले. प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. डॉ. अविनाश कदम होते. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. डॉ. विजय काळे यांनी केले व प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या दिनी प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित राहुन सहभाग दर्शविला.

**जागतिक एड्स निर्मूलन सप्ताह** (International AIDS Eradication Week)

एड्स निर्मूलन सप्ताह निमित्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब तसेच एकात्मिक सल्ला व मार्गदर्शन केंद्र आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रमुख वक्ते म्हणून आरोग्य विभागाच्या सौ. बन्नगरे व सहकारी यांनी विद्यार्थ्यांना एड्स विषयावर मार्गदर्शन करून सर्वांना शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवई प्रा. डॉ. लोकेश वानखडे व प्रा. डॉ. प्रविण काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) तसेच आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रा. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. स्वयंसेवकांना एडस जनजागृती विषयी पत्रक वाटण्यात आले तसेच जागृती करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कारंजा शहरातुन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रॅलीचे आयोजन करण्यात

आले. विद्यार्थ्यांनी रॅलीमध्ये एड्सवर आधारीत विविध घोषणा व पोस्टर च्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये एड्स विषयी जनजागृती केली. या सप्ताह निमित्य महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले याकरीता महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

**आंतरराष्ट्रिय स्वयंसेवक दिवस** (World Volunteers Day)

दिनांक ०५ डिसेंबर २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिवस निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे व प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. रविंद्र सोनटक्के उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) तसेच आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थी हा स्वयंसेवक म्हणून कसा असावा, यावर विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**रक्तगट तपासणी शिबिर** (Blood Detection Camp)

दिनांक २२ फेब्रुवारी २०२० रोजी ग्राम चंदेवाणी येथे रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये ग्रामपंचायत चंदेवाणी येथील गावकऱ्यांची मोफत रक्तगट तपासणी करून देण्यात आली. शिबिराचे उद्घाटन चंदेवाणीच्या सरपंच तथा उपसरपंच यांनी उद्घाटन केले. शिबिरास रेड रिबन क्लब समन्वयक प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई, प्रा. डॉ. लोकेश वानखडे, प्रा. डॉ. पल्लवी उल्हे व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रविण काळे यांनी मार्गदर्शन केले.

**विशेष निवासी श्रमसंस्कार पूर्वतयारी कार्यशाळा** (Workshop on preparation of special residential camp )

दिनांक २७ जानेवारी २०२० ला उद्बोधन वर्ग दिनांक २९ जानेवारी २०२० ला विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर पूर्वतयारी कार्यशाळा, दिनांक ३ फेब्रुवारी २०२० ते ०९ फेब्रुवारी २०२० या कालावधीत जुनापाणी (टॉवर) ता. कारंजा (घा.) जि. वर्धा येथे होणाऱ्या विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर पूर्वतयारी, कार्यनियोजन व प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवकांकरीता कार्यशाळे, उद्बोधन वर्गाने व नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आयोजनाची संपूर्ण माहिती प्रा. डॉ. अमीत याऊल, प्रा. डॉ. गौरव पेठे, प्रा. डॉ. लोकेश वानखडे, प्रा. डॉ. मोहन मेंढे, प्रा. डॉ. प्रविण काळे (कार्यक्रम अधिकारी) तसेच प्रा. डॉ. दिपक धारणे (कार्यक्रम अधिकारी) यांनी केले.

**हिंगणघाट महिला जळीतकांड विरूध्द फेरी** ( Rally against Hinganghat Women Burning Case )

१० फेब्रुवारी २०२० रोजी हिंगणघाट येथे घडलेल्या जळीत महिला हत्याकांड विरूध्द कारंजा शहरातील सर्व शाळा महाविद्यालये तसेच सर्व व्यापारी गावकरी यांच्या व्दारे संयुक्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या कारंजा शहरातुन रॅलीला सुरूवात होवून तहसील कार्यालयापर्यंत ही रॅली काढण्यात आली. रॅलीची सांगता तहसिल कार्यालयात तहसिलदार यांना निवेदन देवून करण्यात आली. रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते.

**जागतिक महिला दिन** (International Women Day- 8th March)

दरवर्षी ८ मार्च जागतीक महिला दिन म्हणुन जगात सगळीकडे साजरा केला जातो. या वर्षी महाविद्यालयात दिनांक ११ मार्च रोजी प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली जागतीक महिला दिनानिमित्य व्याख्यान घेण्यात आले. प्रमुख

वक्त्या म्हणुन प्रा. डॉ. वंदना तागडे होत्या त्यांनी जागतीक महिला दिन कशासाठी साजरा केला जातो, भारतात स्त्रियांचा इतिहासकालीन कार्य, सध्याची देशात तसेच जगात महिला व त्यांचे कार्य इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवई, प्रा. डॉ. अमित याऊल, प्रा. डॉ. दिपक धारणे उपस्थितांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्तावना प्रा. प्रविण काळे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दिपक धारणे कार्यक्रमाचे संचालन कु. वृषाली भांगे हिने केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

**निवासी श्रमसंस्कार शिबिर** (Special Residential Camp)

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पथकाव्दारे स्वच्छ भारत व युवाशक्ती अभियान या संकल्पनेवर आधारीत सात दिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबिर दिनांक ०३ फेब्रुवारी २०२० ते ०९ फेब्रुवारी २०२० या कालावधीत कारंजा (घा.) पासून ०६ कि.मी. अंतरावर असलेल्या ग्राम जुनापाणी (टॉवर) येथे घेण्यात आले. सामाजिक, सांस्कृतीक व राष्ट्रीय दृष्ट्या सुदृढ समाज निर्मिती करीता महाविद्यालयीन युवक युवतींचा जास्तीत जास्त क्रियाशिल उपक्रमांमध्ये सहभाग कसा करून घेता येईल याचाच प्रामाणिक प्रयत्न या सात दिवसीय शिबिरामध्ये करण्यात आला. तसेच शारीरीक, मानसिक व बौध्दिक दृष्ट्या युवाशक्ती समाजकार्यासाठी जागृत करण्याचा प्रयत्नही या शिबिराव्दारे करण्यात आला. ग्रामोन्नतीला सहाय्य होईल, असे समाजमन निर्मितीचा प्रामाणिक प्रयत्न या शिबिरामधील सर्वच कार्यक्रमांच्या आयोजनामागे होता.

दिनांक ०३ फेब्रुवारी २०२० सोमवार ला जुनापाणी (टॉवर) या गावी शिबिर ठिकाणी सर्व शिबिराची पूर्वतयारी करण्यात आली. रात्री ९.०० वाजेपर्यंत गावकऱ्यांना शिबिराच्या आयोजनामागील भूमिका स्वयंसेवकांनी घरोघरी जावून समजावून सांगीतली संपूर्ण गावकऱ्यांचा सक्रीय सहभाग शिबिरात कसा करून घेता येईल हा या भेटीमागील उद्देश होता.

**उद्घाटन समारंभ दिनांक ०४ फेब्रुवारी २०२०** (Inauguration Second Day)

दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० मंगळवार ला दुपारी १२.०० वाजता जुनापाणी (टॉवर) या ठिकाणी उद्घाटन समारंभ संपन्न झाला या प्रसंगी कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून सौ. ताराबाई ढोले (सरपंच) कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. श्री. संजय धनवटे (प्राचार्य, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज,कारंजा घाडगे) प्रमुख वक्ते मा. प्रा. डॉ. स्मिता जाधव (मोहोड) प्रमुख अतिथी मा. प्रा. डॉ. अविनाश कदम (समन्वयक आय.क्यु. ए. सी.) मा. श्री. सतिशराव घागरे (उपसरपंच) मा. श्री. पुरूषोत्तमराव ढोले (पोलीस पाटिल) मा. श्री. लिलाधरराव चौधरी (सदस्य), मा. श्री.रामजी धंडाळे (माजी सरपंच) मा. श्री. पुंडलिकरावजी खवशी (माजी सरपंच), मा. सौ. तुळसाबाई चौधरी (माजी सरपंच) मा. श्री. रेखाताई भस्मे (अध्यक्ष), शाळा व्यवस्थापन समिती, मा. श्री. अमितराव भोयर (मुख्याध्यापक) जि. प. प्रा. शाळा मा. श्री. मुरलीधरराव कुबडे (सहा. शिक्षक), जि. प. प्रा. शाळा मा. श्री. नामदेवराव ढोबाळे (ग्रामसेवक) मा. जमील शेख (सचिव) माजी विद्यार्थी संघटना, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा हे मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांची सामाजिक बांधीलकी यावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. स्मिता जाधव (मोहोड) रा. से. यो. जिल्हा समन्वयक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी निवासी शिबिराची रचना करण्यात आली यावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यासपीठ आदर्श व्यक्तीमत्व घडविण्यास कसे उपयोगी पडते, तसेच आपल्या त्यांच्या विद्यापीठात सुरू असलेल्या यावर विविध अनुभवांसह मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व शिबिराच्या कार्यनियोजनाचे माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रविण काळे व कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दिपक धारणे यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. पुजा हिंगवे हिने केले.

दुपारी ३.०० वाजता शिबिरार्थ्यांचे मनोगत घेण्यात आले. यामध्ये प्रत्येक शिबिरार्थ्यांने व्यासपिठावर येऊन आपला परिचय, छंद व भविष्यातील ध्येयाबद्दल माहिती सांगीतली.

सायंकाळी ७.०० वाजता गावकरी महिलांकरीता महिला मेळावा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. सौ. ताराबाई ढोले (सरपंच) यांनी भूषविले तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. वंदना तागडे यांनी केले. गावकरी महिलांनी या मेळाव्यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन भजन, कविता, महिलांच्या समस्यांवर मनोगत व्यक्त केले.

**दिनांक ०४ फेब्रुवारी २०२०** (Third Day)

सकाळी ०७.३० वाजता पशुचिकीत्सा शिबिर डॉ. आर. जी. घुमडे, डॉ. पी. के बिसांद्रे व चमु, (पशु वैद्यकीय दवाखाना, कारंजा, घा.) यांच्या सहकार्याने पार पडले. यामध्ये गावातील जनावरांची तपासणी व उपचार करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये विविध जनावरे जसे की गाय, बैल, बकरी, म्हैस व कुत्री यांना लसीकरण तसेच इतर आजारांवर उपचार करण्यात आले. दुपारी ०१.०० वाजता गावकऱ्यांकरीता महा दुध प्रकल्प माहिती या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई (प्राणीशास्त्र विभाग) यांनी भूषविले तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एम. डब्ल्यु खंडारे, सहा. आयुक्त, पशुधन विभाग, कारंजा (घा.) हे होते. मान्यवरांनी महाराष्ट्र शासनाव्दारे सुरू असलेल्या महा दुध प्रकल्प विषयी गावकऱ्यांना माहिती दिली व जनावरांना होणाऱ्या संभाव्य रोगाबद्दल माहिती देऊन त्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. गौरी गाडगे हिने केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंकिता डोबले हिने केले. दुपारी ०३.०० वाजता प्रा. डॉ. दर्शन चांभारे, आर्वी यांचे बौध्दिक व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी थोर पुरूषांच्या मनातील युवक या विषयावर शिबिरार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद अशा महापुरूषांना अपेक्षीत असणारा युवक, सध्याचे युवक इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. दिपक धारणे यांनी भुषविले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. अमित याऊल, प्रा. डॉ. लोकेश वानखेडे, प्रा. डॉ. गौरव पेठे, प्रा. डॉ. पुष्पांजली बिडवाई व प्रा. डॉ. पल्लवी उल्हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नौकेश किनकर ह्याने केले तर आभार प्रदर्शन कु. अंकिता डोबले हिने केले.

सायंकाळी ०७.०० वाजता मा. श्री. वसंतदास कुंभारे, दुरदर्शन कलाकार, नागपुर यांचा 'शैक्षणिक कीर्तन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी अध्यात्माचा शैक्षणिक क्षेत्रात कसा उपयोग घ्यावा, यावर मार्गदर्शन, अंधश्रध्दा निमुर्लन इत्यादी विषयांवर कविता व भजन याव्दारे गावकऱ्यांना व शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन गौरी गाडगे हिने केले तर आभार प्रदर्शन योगेश चचाने यांनी केले.

**दिनांक ०६ फेब्रुवारी २०२०** (Fourth Day)

दिनांक ०६ फेब्रुवारी २०२० गुरूवार ला सकाळी ०७.०० वाजता संपूर्ण गावातून रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनधिनता, आरोग्य, लेक वाचवा देश वाचवा, पाणी अडवा पाणी जिरवा इत्यादी विषयावर जनजागृती करण्यात आली. संपूर्ण गावात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचे महत्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. दुपारी ०२.०० वाजता प्रा. डॉ. मोहन मेंढे, कारंजा यांचे बौध्दिक व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना व युवकांची जबाबदारी या विषयावर शिबिरार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्रा. डॉ. अमित याऊल उपस्थित होते. तसेच गावातील माजी विद्यार्थी दिपक चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ह्यांनी केले तर आभार प्रदर्शन ह्यांनी केले.

दुपारी ०३.०० वाजता राजकुमार तिरभाने, कारंजा यांचे बौध्दिक व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी जादुटोणा विरोधी कायदा व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर शिबिरार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्रा. डॉ. उमेश मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. पुजा हिंगवे हिनी केले तर आभार प्रदर्शन अनंता ठाकरे यांनी केले.

सायंकाळी ०७.०० वाजता रेशिम उद्योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा. लोकेश वानखडे होते. त्यांनी शेती सोबत रेशिम उद्योग कसा पुरक ठरेल याबाबात शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गौरव पेठे होते. कार्यक्रमाचे संचालन साकेत बिसांद्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. हेमा गिरडकर हिने केले.

**दिनांक ०७ फेब्रुवारी २०२०** (Fifth Day)

दिनांक ०७ फेब्रुवारी २०२० गुरूवार ला सकाळी ०७.०० वाजता संपूर्ण गावातून रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनधिनता, आरोग्य, लेक वाचवा देश वाचवा, पाणी अडवा पाणी जिरवा इत्यादी विषयावर जनजागृती करण्यात आली. संपूर्ण गावात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचे महत्व गावकऱ्यांना पटवून देण्यात आले. दुपारी ०२.०० वाजता प्रा. डॉ. विजय राघोर्ते, कारंजा यांचे बौध्दिक व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी सौर उर्जा काळाची गरज या विषयावर शिबिरार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. गौतम वाकडे उपस्थित होते. सध्या अपारंपारिक उर्जा किती महत्वाची आहे. तसेच याचा वापर वाढविण्यासाठी काय केले पाहिजे इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमांचे संचालन प्रणव बोरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. कोमल खवशी हिने केले.

दुपारी ०४.०० वाजता आय. सी. टि. सी., ग्रामिण रूग्णालय कारंजा (घा.) व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने युवा दिन संपन्न झाला या कार्यक्रमामध्ये एड्स वर मार्गदर्शन करून उपस्थितांना एड्स जनजागृतीवर सामुहिक शपथ दिली. तसेच एकुण ६२ लोकांचे एड्स चाचणी करण्याकरीता रक्त नमुने घेण्यात आले. व चाचणी करण्यात आली तसेच पूर्ण रक्त तपासणी करण्यात आले. या करीता सौ. बन्नगरे व चमु यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला.

सायंकाळी ०७.०० वाजता शिबिरार्थी व गावकऱ्यांसाठी श्री. प्रा. डॉ. महेन्द्र गावंडे यांचा युवकांचा आर्थिक विकासात सहभाग हा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये त्यांनी डॉ. गावंडे  आर्थिक विकासात युवकांचा कशा प्रकारे सहभाग असू शकतो याविषयांवर सखोल विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान प्रा. डॉ. सरिता राऊत यांनी भुषविले. कार्यक्रमाचे संचालन कु. कोमल खवशे हिने केले तर आभार प्रदर्शन निलेश चरडे यांनी केले.

**दिनांक ०८ फेब्रुवारी २०२०** (Sixth Day)

दिनांक ०८ फेब्रुवारी २०२० शुक्रवार ला सकाळी ०८.३० वाजता गांडूळ खत निर्मिती कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा. डॉ. प्रविण काळे उपस्थित होते गावकरी व विद्यार्थ्यांना परिसरातील निघणाऱ्या सेंद्रिय कचऱ्याव्दारे गांडुळ खत निर्मिती कशी करावी याबाबत मार्ग दर्शन व जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान प्रा. डॉ. पल्लवी उल्हे यांनी भुषविले कार्यक्रमाचे संचालन कु. वृषाली भांगे हिने केले तर आभार भुषण उघडे यांनी केले.

**समारोपीय कार्यक्रम** (Concluding Programs)

दु.११.३० वाजता शिबिराचा समारोपीय कार्यक्रम मा.डॉ.श्री. संजय धनवटे (प्राचार्य,नारायणराव काळे स्मृती मॉडेल

कॉलेज कारंजा, घाडगे) यांच्या अध्यक्षेत संपन्न झाला, प्रमुख वक्ते. मा. प्रा. डॉ. सुनिल पखाले प्रमुख अतिथी मा. सौ. ताराबाई ढोले (सरपंच) मा.श्री.सतिशराव घागरे (उपसरपंच) मा. श्री. लिलाधरराव चौधरी (सदस्य) मा. श्री. रामाजी धंडाळे (माजी सरपंच) मा. श्री. पुंडलिकरावजी खवशी (माजी सरपंच) मा. सौ. तुळसाबाई चौधरी (माजी सरपंच) मा. सौ. रेखाताई भस्मे (अध्यक्ष) शाळा व्यवस्थापन समिती मा. श्री. पुरूषोत्तमराव ढोले (पोलीस पाटील) मा. श्री. अमितराव भोयर (मुख्याध्यापक) जि. प. प्रा. शाळा मा. श्री. मुरलीधरराव कुबडे (सहा. शिक्षक) जि. प. प्रा. शाळा मा. श्री. नामदेवराव ढोबाळे (ग्रामसेवक), श्री. जितेंद्र चौधरी (माजी विद्यार्थी ) व श्री. उद्देश वलगांवकर (सदस्य), माजी विद्यार्थी संघटना, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा हे मान्यवर उपस्थित होते प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सुनिल पखाले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या विविध श्रमसंस्कार शिबिरातून युवकांचा व समाजाचा विकास होतो यावर विविध अनुभवांसह मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, शिबिराचा कार्याचा आढावा व कार्यपूर्ती अहवाल कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रविण काळे व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दिपक धारणे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुणाल उघडे यांनी व्यक्त केले. शिबिरार्थ्यांनी सात दिवसीय शिबिराबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

समारोप प्रसंगी गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी शिबिराच्या स्तुत्य उपक्रमांबाबत शिबिरार्थ्यांचे कौतुक केले.

**दिनांक ०९ फेब्रुवारी २०२०** (Seventh Day)

दिनांक ०९ फेब्रुवारी २०२० रविवार ला सकाळी स्वच्छता अभियान राबवून परिसराची स्वच्छता केली. दुपारी शिबिर आढावा बैठक व ग्रामस्थांशी चर्चा करून शिबिरार्थ्यांनी दुपारी ०४.०० वाजता शिबिर स्थळावरून प्रस्थान केले.

## **शिबिराला मान्यवरांच्या भेटी** (Visit Guest to Camp)

| | | |
|---|---|---|
| १. | **सौ. ताराबाई ढोले** | सरपंच, जुनापाणी |
| २. | **श्री. सतिशराव घागरे** | उपसरपंच, जुनापाणी |
| ३. | **श्री. लिलाधरराव चौधरी** | सदस्य, जुनापाणी |
| ४. | **श्री. पुंडलिकराव खवशी** | माजी सरपंच, जुनापाणी |
| ५. | **श्री. रामाजी धंडाळे** | माजी सरपंच, जुनापाणी |
| ६. | **सौ. तुळसाबाई चौधरी** | माजी सरपंच, जुनापाणी |
| ७. | **श्री. पुरुषोत्तम ढोले** | पोलीस पाटील, जुनापाणी |
| ८. | **सौ. रेखाताई भस्मे** | अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, जुनापाणी |
| ९. | **श्री. अमितराव भोयर** | मुख्याध्यापक, प्रा. शाळा, जुनापाणी |
| १०. | **श्री. मुरलीधरराव कुबडे** | विषय शिक्षक, जुनापाणी |
| ११. | **श्री. नामदेवराव ढोबाळे** | ग्रामसेवक, जुनापाणी |
| १२. | **श्री. जमील शेख** | सचिव, माजी विद्यार्थी संघटना, जुनापाणी |
| १३. | **श्री. जितेंद्र चौधरी** | माजी विद्यार्थी, जुनापाणी |

| | | |
|---|---|---|
| **१४.** | **श्री. उद्देश वलगांवकर** | सदस्य, माजी विद्यार्थी संघटना, कारंजा (घा.) |
| **१५.** | **प्रा. डॉ. सौ. स्मिता जाधव** | कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा, जि. अमरावती |
| **१६.** | **डॉ. एम. डब्लु खंडारे** | सहा. आयुक्त, पशुधन विभाग, कारंजा (घा.) |
| **१७.** | **प्रा. दर्शन चांभारे** | आर्वी |
| **१७.** | **श्री. वसंतराव कुंभारे** | शैक्षणीक किर्तनकार, नागपुर |
| **१८.** | **सौ. बन्नगरे** | प्राथमिक आरोग्य केंद्र, कारंजा (घा.) |
| **१९.** | **डॉ. आर. जी. घुमडे** | पशुधन विभाग अधिकारी, कारंजा (घा.) |
| **२०.** | **प्रा. राजकुमार तिरभाने** | अंधश्रध्दा निर्मूलन समिती, कारंजा (घा.) |

शिबिराच्या यशस्वीतेकरीता प्रा. सुरेश गोडबोले, प्रा. पी. एस. काळे, प्रा. डॉ. रविंद्र सोनटक्के, प्रा. डॉ. गौरव पेठे, प्रा. डॉ. अमित याऊल, प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. डॉ. सुनिल पखाले, प्रा. डॉ. गणेश मोहोड, प्रा. विनय गुडधे, प्रा. वंदना तागडे, प्रा. डॉ. उल्हास राठोड, प्रा. डॉ. महेंद्र गावंडे, प्रा. डॉ. मोहन मेंढे, प्रा. डॉ. पल्लवी उल्हे, डॉ. पुष्पांजली बिडवई, प्रा. डॉ. उमेश मेश्राम, प्रा. डॉ. विजय राघोर्ते, प्रा. डॉ. अतहर हुसेन, प्रा. डॉ. अविनाश कदम, प्रा. डॉ. लोकेश वानखेडे, प्रा. डॉ. गौतम वाकडे, प्रा. डॉ. वैशाली वैद्य, प्रा. डॉ. सरिता राऊत, प्रा. डॉ. दर्शन चांभारे, श्री. जयंत निंभोरकर, श्री. श्रीधर देशमुख, श्री. अजय लोणकर, श्री. राहुल देशमुख श्री. मनोज निंभोरकर, श्री. श्रीधर देशमुख, श्री. वासुदेव हरले, श्री. मंगेश मलगाम, श्री. मनोहर राठोड, सौ. माया सिडाम, ग्रुप लिडर व त्यांची चमू, स्वयंसेवक, स्वयंसेविका उपलब्ध झालेले आचारी, मंडप डेकोरेशन, वाहन व्यवस्था, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले.

## विविध शिबिरात स्वयंसेवकांचा सहभाग
(Participation of Volunteers in Various Camp)

## राज्यस्तरीय शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग
(Participation of Volunteers in State / University / District Level Camp)

### राष्ट्रीय सेवा योजना,नागपूर विद्यापीठ, नागपूर राज्य स्तरीय शिबिर स्थळ-आदासा

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. भुषन यु. उघडे | बी. एस्सी. भाग. -२ |
| २. | श्री. नितीन र. ढोले | बी. एस्सी. भाग. -३ |
| ३. | श्री. नौकेश किनकर | बी. एस्सी. भाग. -३ |
| ४. | श्री. पवन धारपूरे | बी. एस्सी. भाग. -३ |

### राष्ट्रीय सेवा योजना, जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम विद्यापीठ स्तरीय शिबिर, स्थळ - जलालखेडा

| | | |
|---|---|---|
| ५. | श्री. सागर भोसले | बी. ए. भाग. -२ |
| ६. | श्री. ललीत डोबले | बी. एस्सी. भाग. -३ |
| ७. | श्री. धिरज पवार | बी. ए. भाग. -३ |
| ८. | श्री. प्रशांत घागरे | बी. ए. भाग. -३ |
| ९. | श्री. कामा पवार | बी. एस्सी. भाग. -२ |

**राष्ट्रीय सेवा योजना,अरविंदबाबु देशमुख महाविद्यालय, भारसिंगी विद्यापीठ स्तरीय शिबिर, स्थळ - भारसिंगी**

| | | |
|---|---|---|
| १०. | श्री. मयुर महल्ले | बी. एस्सी. भाग. -३ |
| ११. | श्री. अमोल ठोंबरे | बी. एस्सी. भाग. -३ |
| १२. | श्री. अनंता ठाकरे | बी. ए. भाग. -१ |

२०१९ - २० या सत्रामध्ये आमच्या महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे संपन्न झालेल्या नियमित व विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरामध्ये वैविध्यपूर्ण राबविण्यात आलेल्या उपक्रमात अनेक घटकांचा व संस्थांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मनापासून आभार व्यक्त करणे, आम्ही आमचे कर्तव्य समजतो. त्यात प्रामुख्याने आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. श्री. भैय्यासाहेब काळे, सचिव मा. ॲड. सौ. शोभाताई काळे व समस्त संचालक मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक मा. डॉ. केशव वाळके, वर्धा जिल्हा समन्वयक, प्रा. मेघश्याम ढाकरे, आयुष ब्लड बँक,धंतोली, नागपुर चे मेडीकल ऑफीसर प्रा. डॉ. रवि भांगे व सहकारी, राष्ट्रीय सेवा सल्लागार समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व नगर पंचायत कारंजा, वन विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग व पंचायत समिती कारंजा (घा.) येथील सर्व पदाधिकारी, ग्रामपंचायत जुनापाणी येथील सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, पत्रकार वृंद, आमच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी विद्यार्थी, सर्व स्वयंसेवक, समाजसेवी संघटना, जुनापाणी येथील स्वयंसेवी नागरीक या सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी म्हणून आम्ही आपले मनापासून आभार व्यक्त करतो.
धन्यवाद !

**डॉ. संजय धनवटे**
प्राचार्य

**प्रा. डॉ. प्रविण काळे**
कार्यक्रम अधिकारी

**प्रा. डॉ. दिपक धारणे**
कार्यक्रम अधिकारी

**नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज**
(कला, वाणिज्य व विज्ञान) कारंजा (घा.) जि. वर्धा

*****

# The Placement And Guidance Cell

Narayanrao kale Smruti model college, Karanja (gh.), Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur had been organized a different programmed in the session 2019-2020.

The aim of Placement and Guidance Cell is to arranged campus interview of different organization and company and to arrange a seminar, workshop; guidance programmed related to competitive examination like MPSC, UPSC, BANK PO, etc

Placement Guidance cell, Narayanrao Kale Smruti Model College, Karanja (Gh.) dist: Wardha and "SHYAM INDOFAB HOUSE" company, Nandgaopeth Khandeshwar Amravati jointly organized a **Campus Interview** on 30$^{th}$October 2019.This campus drive organized for final year students of B.A, B.Com & B.Sc. More than **50** students appeared for the interview and **15** among them were selected for the post of production associates- front line associates.

Dr. Sontakke presided over the programme, Dr. Kadam, Dr. Raghorte, Mr. Kalla sir from Human resources Department and Ms. Nandekar madam from Human resources and Administration, were present on the Dais. Dr. R. N. Sontakke said rural students should develop their communication skill to grab employment opportunities. Dr. Kadam and Dr. Raghorte also spoke on the occasion. Under the guidance of Principal of the college Dr. Dhanwate, the placement drive was held. Prof. Dharne conducted the proceeding. Dr. Gautam Wakde, Prof. Ather Hussain, Dr. Gaurav Pethe and students strove hard to make the drive successful.

Also one day workshop were organized by PG-cell for degree students on " Personality Development & Competative exam Preparation" on dated 1$^{st}$ February 2020 by Unique Academy Director, Amravati. Dr. Ganesh Mohod, Ms. Pallavi Raut CEO, Nagar Panchayat Karanja, Sau. Kalpana Maski, Corporator, Arun Fadke, chief guest of the program Mr. Amol Patil, Director Unique Acaedemy Amravati, Mr. Sumit Urkudkar were present on the Dais.

Dr. Mohod explained the need of professional courses in new era and role of competitive study, Mr. Amol Patil focus on some important parameter that student have like self-confidence, stage daring, personality development. Mr. Sumit Urkudkar also spoke on the occasion. Under the guidance of Principal of the college Dr. Dhanwate, the one day workshop was held. Dr. Raghorte conducted the proceeding and students strove hard to make the drive successful. The Co-coordinator of placement and Guidance cell Dr. Vijay R. Raghorte with committee members Dr. Deepak Dharne and faculty member of college initiated the workshop program. Such type of program will get benefitted to students of rural area of Karanja and will explore the new idea and concept towards competitive world. Principal Dr. Sanjay P. Dhanwate congratulated the students and urged them to excel in their field.

Dr. Vijay Raghorte
Co-ordinator

Dr. Sanjay Dhanwate
Principal

# Red Ribbon Club

Narayanrao Kale Smruti Model College, Karanja (Ghadge) was established in 1989 and since 2006 science stream has been opened. College participates in various activities along with academic curriculum. National Service Scheme is one of the department in which Red Ribbon Club is a part. In this year 15 members are registered in RRC.

Red Ribbon Club is the international symbol of HIV and AIDs awareness. It is being worn by increasing number of people around the world to demonstrate their care and concern about HIV and AIDs for those who are living with HIV, for those who are ill, for those who have died and for those who care for and support those directly affected.

RRC takes active participation in the awareness of campaign of HIV/AIDS. Students interested in such social awareness are encouraged to be a part of the RRC. Wearing a Red Ribbon is the first step in the fight against HIV/ AIDs. In this year various activities rub by RRC.

**Guidance on AIDS :** On the occasion of International youth day, Red Ribbon Club, Narayanrao Kale Smruti model College Karanja Ghadge in collaboration with rural hospital Karanja Ghadge conducted a program on AIDS awareness dated 12th August 2019. In this program Mrs. Bannagare, HIV, ICTC-counselor, focused on AIDS and gave information about the free check up of AIDS in rural hospital Karanja Ghadge. The program was presided by RRC Coordinator, Dr. Pushpanjali Bidwai. In her presidential speech, she stated prevention is better than cure and asked about immunity power of the body CD4 cells. Dr. L. N. Wankhade gave information about causes of AIDS. Whole program was conducted by Miss. Sujita Deshmukh and vote of thanks expressed by miss. Snehal Devgirkar. 35 students were present in this program.

**Blood donation Camp:** A blood donation camp was organized by Red Ribbon Club, Narayanrao Kale Smruti Model College in collaboration with Ayush blood bank, Dhantoli, Nagpur on 18th September 2019. This camp received spontaneous response of college students. In this camp 25 donors have donated their invaluable blood voluntarily. This constructive initiative was held by Dr. P. A. Bidwai, RRC Coordinator, Dr. P.J. Kale NSS coordinator. Chief of Ayush blood blank, Dr. Bhange was prominently present in the program. Whole program was conducted by Miss. Rutuja Kinkar and vote of thanks was presented by Dr. P. A. Bidwai.

